दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७८ । बुधवार, दि.२२ जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## श्रीरामपूरमध्ये बोगस डॉक्टर विश्वास खैरनार विरोधात गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरात कोणतीही वैध वैद्यकीय पदवी किंवा शासनाची अधिकृत मान्यता नसताना नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या एका बोगस डॉक्टरवर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर आणि परिसरात अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली असून, या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. **पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार**–शहरातील गजानन क्लिनिक, वॉर्ड क्र. ०३, येथे विश्वास खैरनार (बोगस डॉक्टर) यांच्यावर दि. २१ जुलै २०२६ रोजी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं. ७१०/२०२६ भारतीय न्याय संहिता (बी.एन. एस) कलम ३१८ सह वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.श्रीरामपूर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी

**(उर्वरीत पान ४ वर)**

**नागरिकांनी कोणत्याही अनधिकृत किंवा संशयास्पद व्यक्तीकडून वैद्यकीय उपचार करून घेऊ नयेत. आपल्या परिसरात असा कोणताही बोगस डॉक्टर निदर्शनास आल्यास त्याची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी, जेणेकरून वेळीच कठोर कारवाई करता येईल.**

**– श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन**
व तालुका आरोग्य विभाग,
श्रीरामपूर

# दिल्ली आंदोलनाची धग महाराष्ट्रात!

### २३ जुलैला 'महाराष्ट्र बंद'ची हाक; विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जविरोधात विरोधक आक्रमक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने २३ जुलै रोजी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिली आहे. या आंदोलनाला समविचारी पक्ष, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने पाठिंबा द्यावा, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

दिल्लीतील आंदोलनाला आता स्पष्टपणे राजकीय स्वरूप प्राप्त होत असून विविध विरोधी पक्षांचे नेते आंदोलनस्थळी दाखल होत आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हेही आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिल्लीला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांवरील कारवाईनंतर केंद्र सरकारवर विरोधकांकडून जोरदार टीका सुरू झाली असून आंदोलनाची धग आता महाराष्ट्रातही पोहोचली आहे.

दरम्यान, आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारवर टीका करत, भारतीय नागरिकांवरच हल्ला करण्यात आला. यापूर्वी शेतकरी आंदोलनालाही सरकारने विविध नावांनी बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.



### अहिल्यानगरात आंबेडकरी संघटनांची निदर्शने

**दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अहिल्यानगरमध्ये विविध आंबेडकरी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. रिमझिम पावसातही कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू ठेवत मोदी हटाव, देश बचाव, हम क्या चाहते... आजादी, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस दडपशाहीचा निषेध करत केंद्र सरकारने या प्रकरणात भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.**



## पंतप्रधान निवासाबाहेर विरोधकांचा ठिय्या राहुल गांधींसह खासदारांना उचलले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईच्या निषेधार्थ लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या सुमारे १२० खासदारांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन केले. साडेतीन ते चार तास चाललेल्या आंदोलनानंतर पोलिसांनी सर्व आंदोलक खासदारांना ताब्यात घेतले. यावेळी राहुल गांधी हटण्यास तयार नसल्याने पोलिसांनी त्यांना उचलून वाहनात बसवल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, पोलिसांशी त्यांची झटापट झाली.

## आज जाहीर होणार शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी !

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्य सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीला वेग आला असून प्राथमिक लाभार्थी यादी आज जाहीर केली जाणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. केंद्र सरकारकडून आयकर परताव्याचा आवश्यक डेटा प्राप्त झाल्याने तांत्रिक अडचणी दूर झाल्या असून ३० जुलैपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मंत्रिमंडळ बैठकीत कर्जमाफीची प्रक्रिया जुलैअखेरीस पूर्ण होईल, असे संकेत दिले होते. दरम्यान, खरीप २०२५ हंगामातील बोगस सोयाबीन बियाणे प्रकरणात सरकारने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. राज्यभरातून ११,५८४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ८,१९२ प्रकरणांची तपासणी पूर्ण झाली आहे.










# लाठीच्या सावलीतील लोकशाही!

**विशेष संपादकीय**
**करण नवले (संपादक)**

लोकशाहीची खरी ताकद सत्तेच्या वैभवात नसते, तर सत्तेला प्रश्न विचारण्याच्या नागरिकांच्या अधिकारात असते. नीट पेपर फुटीमुळे वीस पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची बळी गेले, अनेकांचे स्वप्न भंगले. विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, आंदोलने करतात, घोषणाबाजी करतात, कारण त्यांना त्यांच्या भविष्याबद्दल चिंता असते. अशा वेळी सरकारची पहिली जबाबदारी संवाद साधण्याची असते; दडपशाही करण्याची नव्हे.

दिल्लीतील जंतर-मंतरवर नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील गोंधळ आणि शिक्षण व्यवस्थेतील उत्तरदायित्वाच्या प्रश्नांवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईची दृश्ये देशभर चर्चेचा विषय ठरली. आंदोलकांना हटविणे, बळाचा वापर, अश्रुधुराचा मारा, पाण्याच्या फवाऱ्यांचा वापर आणि आंदोलनकर्त्यांवरील कठोर कारवाई यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीवर सरकारने आणि संबंधित यंत्रणांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

या आंदोलनात पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ उपोषण केले. त्यांच्या उपोषणादरम्यान त्यांना रुग्णालयात हलविण्याच्या पद्धतीवरही अनेक स्तरांतून प्रश्न उपस्थित झाले. कोणत्याही लोकशाहीत सरकारविरोधी भूमिका घेणे हा गुन्हा नसतो. सरकारशी असहमती व्यक्त करणे हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. त्या अधिकाराला उत्तर म्हणून लाठी दिली जात असेल, तर लोकशाहीच्या आरशात दिसणारे प्रतिबिंब निश्चितच चिंताजनक आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे आंदोलनकर्त्यांवर कारवाई करणाऱ्या काही पोलिसांच्या ओळखी झाकल्या गेल्याच्या चर्चा सामाजिक माध्यमांतून पुढे आल्या. जर ही बाब वस्तुस्थिती असेल, तर उत्तरदायित्वाच्या मूलभूत तत्त्वालाच धक्का बसतो. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी पारदर्शकतेचे उदाहरण घालून द्यायला हवे; संशय निर्माण करणारी परिस्थिती नव्हे.

आज प्रश्न फक्त नीट परीक्षेचा नाही. प्रश्न आहे शासनाच्या उत्तरदायित्वाचा. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य प्रभावित करणाऱ्या घटनांनंतर समाजात अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशा वेळी लोकांना आश्वस्त करण्याऐवजी आंदोलने दडपली गेली, तर संशय अधिक गडद होतो. शासनाने उत्तराऐवजी शक्तीचा वापर केला, तर लोकांच्या मनात ''नेमके काय लपवले जात आहे?'' हा प्रश्न निर्माण होतो.

राजीनामा हा कोणत्याही समस्येचा अंतिम उपाय नसतो. परंतु लोकशाहीत नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची परंपरा महत्त्वाची मानली जाते. प्रशासनातील गंभीर त्रुटी किंवा सार्वजनिक विश्वासाला धक्का बसणाऱ्या घटनांनंतर संबंधितांनी जबाबदारी स्वीकारणे ही लोकशाही संस्कृतीचा भाग आहे. अशी अपेक्षा व्यक्त करणे हे सरकारविरोधी कृत्य नसून लोकशाहीचे आरोग्य टिकवण्याचा प्रयत्न आहे.

आज शिक्षण क्षेत्राबद्दल प्रश्न विचारले जात आहेत. उद्या रेल्वे, आरोग्य, पर्यावरण, अर्थव्यवस्था किंवा इतर कोणत्याही विभागाबाबत विचारले जातील. लोकशाहीत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि सरकारवर उत्तर देण्याचे कर्तव्य आहे. प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही, अराजकवादी किंवा शत्रू समजण्याची प्रवृत्ती वाढत गेली, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरेल.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत, शत्रू नाहीत. त्यांच्या हातात पुस्तके असावीत, पोलिसांच्या लाठ्या नव्हे. त्यांच्या डोळ्यांत स्वप्ने असावीत, अश्रुधुराचे धुरकट ढग नव्हे. शासनाने विद्यार्थ्यांना विरोधक म्हणून नव्हे, तर भविष्याचे नागरिक म्हणून पाहिले पाहिजे.

लोकशाहीची खरी परीक्षा निवडणुकांत होत नाही; ती सत्तेविरोधात उभ्या राहिलेल्या नागरिकांशी सरकार कसे वागते यावरून ठरते. सरकारला टीका ऐकण्याची क्षमता नसेल, तर लोकशाहीचा आत्माच कमकुवत होतो. नागरिकांच्या प्रश्नांना दडपून शांतता निर्माण करता येते; पण विश्वास निर्माण करता येत नाही.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ओळी आजही समाजमनाला अस्वस्थ करतात...

**''ही न्यायव्यवस्था काहीकांची रखेल झाली,**
**ही संसद देखील हिजड्यांची हवेली झाली**
**मी माझ्या व्यथा मांडू कोणाकडे..?**
**कारण इथली न्यायव्यवस्था भ्रष्टतेने रंगीन झाली..!''**

या ओळी साहित्यिक अभिव्यक्ती आहेत; त्या व्यवस्थेबद्दलच्या असंतोषाचे प्रतीक म्हणून अनेकदा उद्धृत केल्या जातात. मात्र कोणत्याही लोकशाहीचे खरे बळ अशा भावना निर्माण होऊ नयेत यासाठी उत्तरदायी, संवेदनशील आणि पारदर्शक शासन उभारण्यात असते. सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येक नागरिकाला दाबणे शक्य असले तरी प्रश्नांना कायमचे गप्प करता येत नाही. उत्तरांची जागा लाठ्या घेऊ शकत नाहीत. दडपशाही तात्पुरती शांतता देऊ शकते; परंतु जनतेचा विश्वास फक्त संवाद, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वानेच जिंकता येतो.

आजचा प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचा नाही. तो भारतीय लोकशाहीचा आहे. सरकारने टीकेला शत्रुत्व समजायचे की लोकशाहीचा आवश्यक भाग, हा निर्णय भविष्यातील भारताची दिशा ठरवणार आहे. जनतेच्या प्रश्नांना उत्तर देणारे सरकारच इतिहासात सन्मानाने उभे राहते; प्रश्न विचारणाऱ्यांना गप्प करणाऱ्या सत्ता काळाच्या ओघात संपल्याची अनेक उदाहरणेही इतिहासात सापडतात. आज शिक्षणासंबंधी प्रश्न उपस्थित झाला, उद्या इतर खात्याशी संबंधित प्रश्न विचारले जातील. सरकार कुणाकुणाला गप्प करणार. राजकीय पक्ष फोडता फोडता नागरिक होण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या तरुणांची डोके आणि नडग्या सरकार फोडून सरकार टिकत नाही, हे सत्ताधाऱ्यांना कधी समजणार..?

# जनआरोग्य योजनेत उपचारासाठी २० हजारांची लाच; व्यवस्थापकासह कर्मचाऱ्यावर गुन्हा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर शहरातील नामांकित मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत रुग्णावर शस्त्रक्रिया व उपचार करून देण्यासाठी तब्बल २० हजार रुपयांची लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पडताळणीत हा प्रकार उघडकीस आल्यानंतर हॉस्पिटलमधील योजनेचा कर्मचारी आणि व्यवस्थापक अशा दोघांविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संगमनेर तालुक्यातील शहर हद्दीत असलेल्या पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ मे २०२५ रोजी तक्रारदाराच्या आईवर महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून शस्त्रक्रिया व उपचार करण्यासाठी हॉस्पिटलमधील योजनेचा कर्मचारी सुभाष दगडू धादवड (वय २९, रा. घुलेवाडी फाटा, संगमनेर) याने २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. एवढेच नव्हे तर, पैसे दिल्यानंतर कोणतेही अधिकृत बिल मिळणार नसल्याचे सांगून रक्कम स्वीकारण्याची तयारीही दर्शविल्याचा आरोप आहे.

तक्रारदाराने याबाबत हॉस्पिटलचे व्यवस्थापक सुजित दामोदर गायकवाड (वय ३४, रा. मालदाड रोड, संगमनेर) यांच्याकडे बिलाबाबत विचारणा केली असता, ''जे ठरले आहे त्यात कमी होणार नाही,'' असे सांगत त्यांनी कर्मचाऱ्याच्या लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या संपूर्ण संभाषणाचे व्हॉइस रेकॉर्डिंग तक्रारदाराने केले होते. त्याची अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता लाच मागणीचा प्रकार प्रथमदर्शनी निष्पन्न झाल्याचे समोर आले.

याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सोमवारी (दि. २० जुलै) संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६९७/२०२६ नोंदविण्यात आला आहे.

आरोपी सुभाष धादवड आणि सुजित गायकवाड यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७(अ) व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.या घटनेमुळे सर्वसामान्य रुग्णांसाठी असलेल्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, उपचारासाठी लाच मागितल्याच्या आरोपामुळे संगमनेरमधील मेडिकव्हर हॉस्पिटल पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या प्रकरणात पुढील तपासात आणखी कोणती माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# घरात शिरलेल्या पाच फूट नागिणीला सर्पमित्राकडून जीवदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी ।** संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथे प्रगतशील शेतकरी बाळासाहेब गायकवाड यांच्या निवासस्थानी पाच फूट लांबीची नागीण आढळून आल्याने परिसरात काही काळ घबराट पसरली. गायकवाड यांनी तात्काळ सर्पमित्र शिवप्रसाद पवार यांना माहिती दिली. माहिती मिळताच सर्पमित्र शिवप्रसाद पवार यांनी घटनास्थळी धाव घेत सुरक्षितपणे नागीणीला पकडले. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. त्यानंतर नागीणीला कोणतीही इजा न करता नैसर्गिक अधिवासात सुरक्षितरीत्या सोडून देण्यात आले.




# ऑलिम्पियाड स्पर्धेत द्रोणा अकॅडमीचे दैदिप्यमान यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी ।** राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी ऑलिम्पियाड स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पदके, ट्रॉफी, प्रमाणपत्रे आणि बक्षिसे मिळवली.



स्पर्धेत शिवेंद्र जयराज दंडवते याने प्रथम, तर शिवांश राहुल नेहे याने द्वितीय क्रमांक मिळवला. विजयी गुडिया प्रजापती, शिवराज युवराज भोसले आणि शिवांश जाट यांनी उत्तेजनार्थ यश मिळवले. तसेच विरांश किशोर डोके, अलिषा मोशीन शेख, देवांश राहुल नेहे, प्रणम्य केतन वाणी आणि स्वरा अमित खांडरे यांनी गोल्ड मेडल पटकावत अकॅडमीचे नाव उज्ज्वल केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेत मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ता दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम तसेच शिक्षक-शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यायशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे दर्जेदार मार्गदर्शन असल्याचे संस्थेच्या व्यवस्थापनाने सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी द्रोणा अकॅडमी सातत्याने कार्यरत असून या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संविधानाशी छेडछाड खपवून घेणार नाही

## उपवर्गीकरण रद्द करा! देवगडात भीमसैनिकांचा एल्गार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर :** आंबेडकरी संघटना, सामाजिक संघटना व भीमसैनिकांची एकजूट; गावोगावी जनजागृती करून महामोर्चा यशस्वी करण्याचा निर्धार प्रतिनिधी मोहन शेगर सोनई नेवासा,अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेला तीव्र विरोध दर्शवत नेवासा तालुक्यातील विविध आंबेडकरी संघटना, सामाजिक संघटना, पक्षांचे पदाधिकारी आणि भीमसैनिक यांनी श्रीक्षेत्र देवगड येथे रविवारी भव्य तालुकाव्यापी बैठक घेत संविधान संरक्षणाचा एल्गार पुकारला. उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी, अन्यथा राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देत १७ ऑगस्ट रोजी नेवासा तहसील कार्यालयावर भव्य महामोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली.

बैठकीत जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात यांनी मार्गदर्शन करताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधानाशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे ठामपणे सांगितले.

प्रा. सातुरे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पोपट सरोदे, महासचिव गणपतराव मोरे, दयानंद खिल्लारे, सुनील वाघमारे, बाबासाहेब आल्हाट, सुरेश गायकवाड आदींनीही संविधान रक्षणासाठी एकजुटीने संघर्ष करण्याचे आवाहन केले.

यावेळी रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, जिल्हा सरचिटणीस संजय बनसोडे, तालुकाध्यक्ष सुशील धायजे, संतोष साळवे, बाळासाहेब केदारे, नितीन भालेराव, प्रा. सातुरे, पोलीस पाटील आदेश साठे, भास्कर लिहिणार, सुनील वाघमारे, शहराध्यक्ष पप्पू इंगळे, माजी संचालक कडूबाळ गायकवाड यांच्यासह असंख्य भीमसैनिक उपस्थित होते.



# साईमंदिर परिसरातील हत्याकांडानंतर सुरक्षा कडक

## अवैध व्यवसायांवर कारवाईचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी ।** साईमंदिर परिसरात फळविक्रेत्या महिलेच्या हत्येच्या घटनेनंतर शिर्डीत सुरक्षेच्या उपाययोजनांना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी साईबाबा संस्थानच्या सुरक्षा विभागाची तातडीची बैठक घेऊन मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्था, अवैध व्यवसाय आणि अतिक्रमणांबाबत कठोर भूमिका जाहीर केली.



संस्थानच्या सभागृहात झालेल्या बैठकीत सुरक्षा विभागातील अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. शिर्डीत येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असून, मंदिर परिसरात किंवा नगरपरिषद हद्दीत कोणताही अवैध व्यवसाय अथवा बेकायदेशीर प्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा शेळके यांनी दिला. सुरक्षा रक्षकांना ड्युटीदरम्यान कोणतीही अडचण आल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन करत सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांनाही अधिक सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीनंतर उपनगराध्यक्षांनी सुरक्षा पथकासह साईमंदिर परिसरातील चारही प्रमुख प्रवेशद्वारांवर रूट मार्च काढून सुरक्षेचा आढावा घेतला. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, हत्येप्रकरणातील आरोपीच्या कुटुंबीयांची चौकशी करण्यात आल्याची माहिती देत, त्यांनी शिर्डी सोडण्याबाबत सांगितल्याचा दावा उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी केला. या प्रकरणात पुढील कायदेशीर कार्यवाही संबंधित यंत्रणांकडून सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# लग्न सोहळ्याच्या आनंदावर विरजण..!

## वऱ्हाडावर टोळक्याचा जीवघेणा हल्ला; चौघे गंभीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव :** मामाच्या लग्नाचा आनंदोत्सव साजरा करून घरी परतणाऱ्या वरहाड्यांवर जुन्या वैमनस्यातून झाडीत दबा धरून बसलेल्या टोळक्याने मध्यंतरी रस्त्यात अडवून बेछूट हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. लोखंडी रॉड, दगड आणि सायकलच्या साखळीने केलेल्या या प्राणघातक हल्ल्यात चार तरुण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना पवळदरा-कन्हेरा रस्त्यावरील मराठी शाळेजवळ रविवारी (दि. २० जुलै) सायंकाळी घडली.

पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, पोखरी बाळेश्वर (ता. संगमनेर) येथील एकनाथ बाळू जाधव (वय २६) हे कुटुंबासह मजुरी करतात. रविवारी त्यांच्या मामाचे लग्न पवळदरा-कन्हेरा (ता. पारनेर) येथे होते. लग्नसोहळा पार पडल्यानंतर सायंकाळी ४:१० वाजेच्या सुमारास एकनाथ हे आपल्या मित्रांसह (दिगंबर मधे, सुरज मधे, अजय मधे, अक्षय मधे, प्रकाश काळे, अंकित दुधवडे) मोटारसायकलवरून घरी परतत होते.

वरहाडी मंडळी पवळदरा मराठी शाळेजवळ पोहोचताच, रस्त्याच्या कडेला झाडीत लपून बसलेल्या १५ ते २० जणांच्या टोळक्याने त्यांना घेरले. ''तुम्ही भावड्याला काय म्हणाले होते?'' असा जाब विचारत, जुन्या वादाचा राग मनात धरून नितीन काळे (रा. बाळंद्री) व त्याच्या साथीदारांनी अचानक लोखंडी रॉड, दगड, काठ्या आणि साखळीने हल्ला चढवला.

। हल्ल्यात एकनाथ जाधव यांच्या डोक्यावर दगड व काठीने वार करण्यात आले, तर अक्षय मधे यांच्या डोक्यावर व डोळ्यावर लोखंडी रॉडने वार झाल्याने ते गंभीर जखमी झाले. सुरज, अजय आणि दिगंबर मधे यांनाही जबर मारहाण झाली आहे.

हल्ल्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी एकनाथ जाधव यांच्या फिर्यादीवरून घारगाव पोलीस ठाण्यात नितीन काळे व त्याच्या १५ ते २० साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# आत्मा मालिक एनडीए अकॅडमीच्या प्रबुद्ध इंगळेची लेफ्टनंटपदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** आत्मा मालिक एनडीए पूर्वतयारी अकॅडमीचा विद्यार्थी प्रबुद्ध संजय इंगळे याची भारतीय सैन्यदलात लेफ्टनंटपदासाठी निवड झाली. या निवडीमुळे या ॲकाडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्याच्या निवडीचे वृत्त समजताच ॲकाडमीतील अन्य विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. अशी माहिती या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिंदे यांनी दिली. विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी प्रबुध्दच्या यापुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या ॲकाडमीत त्याला जे प्रशिक्षण मिळाले आणि त्याने अध्यात्मिक वातावरणात जे संस्कार ग्रहण केले त्याचे हे फलीत आहे. अशी प्रतिक्रीया त्यांनी व्यक्त केली.शिंदे म्हणाले, त्याच्या या यशामुळे ॲकाडमीतील सर्व प्रशिक्षकांच्या कष्टीचे चिज झाले आणि अन्य विद्यार्थ्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे. राष्ट्रप्रेम, शिस्त, चारित्र्य आणि सेवाभाव जपणारे जबाबदार अधिकारी तयार करणे हे संस्थेचे कठोर परिश्रम, पालकांचा विश्वास आणि संस्थेच्या प्रशिक्षकांच्या समर्पित कार्यातून प्रबुध्दची जडणघडण झाली आहे. भविष्यातही आत्मा मालिक एनडीए पूर्वतयारी अकॅडमीमधील तरुण भारतीय सैन्यात अधिकारी या नात्याने देशसेवेसाठी जातील असा आम्हाला विश्वास वाटतो.



# गंगापूर उपविभागाला दंगा नियंत्रणासाठी स्वतंत्र वाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर:** कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांचा तात्काळ प्रतिसाद मिळावा या उद्देशाने ग्रामीण पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी गंगापूर पोलीस उपविभागासाठी दंगा नियंत्रण वाहन उपलब्ध करून दिले आहे. हे वाहन गंगापूर, शिल्लेगाव आणि रंगारी देवगाव या पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात दंगल, जमावबंदीचे उल्लंघन, मोर्चे, आंदोलन तसेच इतर कायदा-सुव्यवस्थेच्या प्रसंगी वापरण्यात येणार आहे. या नव्या वाहनाची पूजा उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश पालवे, पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल झांजुर्णे तसेच गंगापूर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. दंगा नियंत्रण वाहनामध्ये पोलिस जवानांना सुरक्षितपणे घटनास्थळी पोहोचविण्याची क्षमता असून आवश्यक दंगा नियंत्रण साहित्य, संरक्षक उपकरणे, हेल्मेट, ढाली, लाठ्या तसेच इतर आवश्यक साहित्य वाहून नेण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही संवेदनशील परिस्थितीत पोलिसांची कार्यवाही अधिक वेगवान, प्रभावी आणि समन्वयपूर्ण होण्यास मदत होणार आहे.

या वाहनामुळे गंगापूर उपविभागातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे हाताळता येणार असून नागरिकांच्या सुरक्षेला आणखी बळ मिळणार असल्याची भावना पोलिस प्रशासनाने व्यक्त केली. वाहन उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामीण पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आभार मानले आहे.

# दिंड्या पंढरपूरच्या वेशीवर; वाहतूक कोंडी अन् खासदार निलेश लंकेंकडून वारकऱ्यांचे स्वागत

**भाऊसाहेब काळे । राष्ट्र सह्याद्री**

**पंढरपूर :** आषाढी एकादशीची यात्रा २५ जुलै रोजी होत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर विविध ठिकाणांहून आलेल्या सर्व दिंड्या २१ जुलै रोजी करमाळा येथून मार्गस्थ झाल्या आहेत.या दिंड्या आता टेंभुर्णी आणि करकंब मुक्कामी असून, पुढील तीन दिवसांत म्हणजेच २४ जुलैपर्यंत पंढरपूरला पोहोचणार आहेत.सर्वच प्रमुख दिंड्या पंढरपूरच्या वेशीवर पोहचल्या आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा ते टेंभुर्णी, करकंब ते पंढरपूर हा मार्ग सध्या वारकऱ्यांच्या गर्दीमुळे 'हाऊसफुल्ल' झाला आहेत. मात्र, दिंडीच्या ताफ्यातील हजारो सामानाचे ट्रक, पाण्याचे ट्रॅक्टर आणि टँकर रस्त्यावर शिस्तीत न चालता एकेरी लेनचे नियम मोडून मध्येच घुसत असल्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक पोलीसही या बेशिस्त वाहनांमुळे त्रस्त झाल्याचे दिसून येत आहेत. दिंडी सोहळ्याव्यतिरिक्त पंढरपूरकडे दर्शनासाठी जाणाऱ्या इतर वाहनचालकांनाही यामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहेत.तथापि, पालखी सोहळे जसे-जसे पुढे मार्गस्थ होत आहेत, तसतसे मागील रस्ता वाहतूक हळूहळू सुरळीत होत आहे.

पावसाची संततधार सुरू असतानाही, टेंभुर्णी ते पंढरपूर मार्गावर वारकऱ्यांच्या स्वागतासाठी खास उपक्रम राबविण्यात आला.

**विठू नामाच्या गजरात भक्तीमय वातावरण**

दिवसभर सुरू असलेल्या पावसातही वारकरी तशाच उत्साहात 'विठू नामाचा गजर' करत, वाजत-गाजत आणि नाचत अत्यंत आनंदाने पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत.

खासदार निलेश लंके यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही सर्व दिंडींमधील वारकऱ्यांना पाणी बॉटल, चहा, वडापाव आणि उपवासासाठी फराळ वाटप करण्यात आले.स्वतः खासदार निलेश लंके व्यासपीठावर उभे राहून वारकऱ्यांचे मनोभावे स्वागत करत त्यांना चहा-नाश्ता करण्याचे आवाहन करताना दिसत होते.




# वडाळा महादेव कॉलेजमध्ये जबरी चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील नेवासा रस्त्यावरील एका महाविद्यालयातून चोरट्यांनी दरवाजे तोडून तब्बल ६ लाखांची प्रवेश शुल्क रक्कम आणि ६ हजार रुपयांचे दोन सीसीटीव्ही डिव्हीआर लांबवले आहेत.

प्राचार्यांनी दिवसभराचे फीचे पैसे कपातात सुरक्षित ठेवले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी वर्कशॉप इमारतीचा कोयंडा आणि कार्यालयाचे दरवाजे व कपाटाचे कुलूप तोडल्याचे उघडकीस आले. सामान अस्ताव्यस्त पडलेले असून पुरावा नष्ट करण्यासाठी चोरांनी सीसीटीव्हीचे डिव्हीआरही चोरून नेले. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.या चोरीत मात्र गुन्हेगारी लोकांचा हात असल्याची चर्चा सुरू आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल



### 'झाडे लावा, संस्कार रुजवा'चा संदेश देत सांगवीत बालदिंडी व वृक्षदिंडी

**चांदा :** नेवासा तालुक्यातील सांगवी येथील जि.प. प्राथमिक शाळेत बालदिंडी व वृक्षदिंडी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष करत तसेच पर्यावरण संवर्धनाचे संदेश देत गावातून आकर्षक दिंडी काढली. दिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात वृक्षरोपे, पर्यावरण जनजागृतीपर फलक आणि झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा, भविष्य घडवा अशा घोषवाक्यांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले. दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागाने आणि वारकरी संस्कृतीच्या दर्शनाने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीदरम्यान हरिभाऊ कर्डिले यांनी सर्व बालवारकरी, शिक्षक व उपस्थितांसाठी नाश्ता व चहापानाची व्यवस्था केली. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर होले यांनी सर्व बालवारकरी, ग्रामस्थ व उपस्थितांसाठी महाप्रसादरूपाने भोजनाची उदार व्यवस्था करून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

### अशोक इंग्लिश स्कूलमध्ये आत्मसंरक्षण व सशक्तिकरण शिबिर



**वडाळा महादेव :** अशोक इंग्लिश मीडियम स्कूल आणि लिनेस क्लब श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत विद्यार्थिनींसाठी आत्मसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २० जुलै ते २४ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित या शिबिराचे उद्घाटन लिनेस क्लबच्या अध्यक्षा डॉ. मीनल फुलवर आणि अशोक ग्रुप ऑफ स्कूल्सच्या को-ऑर्डिनेटर मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या हस्ते झाले. माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्या संकल्पनेतून व मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर होत आहे. संघर्ष बहुउद्देशीय फाउंडेशनचे रेश्मा शिंदे व अशोक शिंदे विद्यार्थिनींना कराटे व मार्शल आर्टचे धडे देत आहेत. प्रारंभी प्राचार्य संपत देसाई यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन नीतू गायकवाड यांनी, तर आभार मोनी गोंडे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थिनी व मान्यवर उपस्थित होते.

### महिलेची साडी ओढून विनयभंग; अॅट्रॉसिटी दाखल

**राहुरी :** महिलेची साडी ओढत असताना विरोध केल्याने महिलेच्या वडीलांना मारहाण करण्यात आली. मारहाण केल्याचा जाब विचारला असता मुलाला जातीवाचक शिवीगाळ करुन लोखंडी गजाने बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना राहुरी तालुक्यातील जांभळी येथे दि. १५ जुलै रोजी घडली. राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. १५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी वाजेच्या सुमारास आरोपी राजु बाचकर हा एका महिलेची साडी ओढत होता. तेव्हा महिलेच्या वडिलांनी विरोध केला असता आरोपीने त्यांना लोखंडी गजाने मारहाण केली. पिडीत महिलेच्या भावाने मारहाण केल्याचा जाब आरोपींना विचारला. तेव्हा आरोपींनी त्यांना पून्हा जातीवाचक शिवीगाळ करुन लोखंडी गजाने बेदम मारहाण केली. तसेच एके एकाला मारून टाकु अशी धमकी दिली. या घटनेत वडील व मुलगा गंभीर जखमी झाले होते. त्यांनी अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतल्या नंतर राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी राजु गंगाराम बाचकर, नेहा राजु बाचकर, हौसाबाई राजु बाचकर, बाजीराव गंगाराम बाचकर, सर्व रा. वावरथ, ता. राहुरी, यांच्यावर विनयभंगासह ट्रोसीटी गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास श्रीरामपुर येथील उप विभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर हे करीत आहे.

### नवीन मराठी शाळेत बालवाडी विभागात पालक मेळावा उत्साहात



**श्रीरामपूर :** हिंद सेवा मंडळाच्या नवीन मराठी शाळेत बालवाडी विभागाचा पालक मेळावा उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. चेअरमन ऋषिकेश जोशी व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थी गुणवत्ता वाढीबाबत पालकांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक भरत शेंगाळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रमिला इनामके यांनी तर आभार नीलिमा वाबळे यांनी मानले.

### प्रथम श्रेणीत एलएलबी उत्तीर्ण प्रतीक्षा जोशी वकील बनली

**पुणतांबा :** पुणतांबा येथील प्रतीक्षा उदय जोशी हिने एलएलबी (विधी) परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत वकील होण्याचा मान मिळवला आहे. नाशिक येथील गोखले एज्युकेशन



सोसायटीच्या नरहर बळवंत ठाकूर लॉ कॉलेजमध्ये तिने पाच वर्षांचे विधी शिक्षण पूर्ण केले. सातत्यपूर्ण परिश्रम व अभ्यासाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले. प्रतीक्षा ही पुणतांब्याचे ग्रामपुरोहित उदय जोशी यांची कन्या तसेच पत्रकार अजय जोशी यांची पुतणी आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पुणतांबा परिसरातील ग्रामस्थ, नातेवाईक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# युरिया आंदोलनाला महायुती नव्हे त्रुटी जबाबदार : आ. खताळ

## शेतकी संघाच्या नियोजनाचा अभाव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** संगमनेरमध्ये युरिया वितरणादरम्यान झालेल्या रस्ता रोको आंदोलनासाठी महायुती सरकार किंवा कृषी विभाग जबाबदार नसून, माजी आमदारांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या शेतकी संघाच्या वितरण व्यवस्थेतील त्रुटीच कारणीभूत असल्याचा आरोप आमदार अमोल खताळ यांनी केला. महायुती सरकारवर आरोप करण्याऐवजी शेतकी संघाने स्वतःची वितरण व्यवस्था सुधारावी, असा सल्लाही त्यांनी दिला. जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आ. खताळ म्हणाले की, खरीप हंगामातील युरियाची वाढती मागणी लक्षात घेऊन कृषी विभागाची जिल्हास्तरीय आढावा बैठक संगमनेर येथे घेण्यात आली होती. त्यानंतर तालुक्यासाठी ३५० टन युरियाचा बफर स्टॉक तातडीने उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले. पावसाच्या उशिरामुळे पेरण्या उशिरा झाल्याने अल्पावधीत खताची मागणी वाढली. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने आवश्यक उपाययोजना केल्या होत्या. मात्र, शेतकऱ्यांना टोकन वाटप व वितरणाची जबाबदारी शेतकी संघाकडे असल्याने नियोजनातील त्रुटींमुळे अनेक शेतकऱ्यांना खत मिळाले नाही आणि आंदोलनाची वेळ आली, असे त्यांनी सांगितले.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वितरण प्रक्रियेची चौकशी करण्याचे आदेश कृषी विभागाला देण्यात आले असून, टोकन वाटप व वितरणातील अनियमिततेची सखोल चौकशी होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काहीजण राजकीय हेतूने शेतकऱ्यांना भडकवत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**लिंकिंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई**

शेतकऱ्यांच्या हक्काच्या खतावर कोणाचाही डल्ला खपवून घेतला जाणार नाही. खत विक्रीमध्ये लिंकिंग करणाऱ्या विक्रेत्यांना कोणतीही माफी नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचा परवाना रद्द करण्यात येईल. शेतकऱ्यांची आर्थिक लूट करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना कृषी विभागाला देण्यात आल्या आहेत. **आ. अमोल खताळ**



**शेतकी संघाच्या नियोजनावर प्रश्न**

शेतकऱ्यांना टोकन वाटपाची जबाबदारी शेतकी संघाकडे होती. मात्र, अनेक शेतकरी दिवसभर रांगेत उभे राहूनही खतापासून वंचित राहिल्याने संतप्त होऊन त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे आ. खताळ म्हणाले.

**वितरण प्रक्रियेची होणार चौकशी**

युरिया वितरणात टोकन वाटप, नियोजन आणि पारदर्शकतेबाबत त्रुटी राहिल्या का, याची कृषी विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात येणार आहे. दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल, असे आमदार खताळ यांनी सांगितले.

**पावसाच्या विलंबामुळे वाढली युरियाची मागणी**

यंदा पावसाचे आगमन उशिरा झाल्याने खरीप पेरण्या उशिराने झाल्या. त्यामुळे कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर युरियाची मागणी वाढली. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने बफर स्टॉक खुला करून खत उपलब्ध करण्याचा निर्णय घेतल्याचे आ. खताळ यांनी सांगितले.

# छ. शिवाजी महाराज व्यापारी संकुलाच्या नूतनीकरणास प्रशासकीय मान्यता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राहाता :** राहाता शहरातील व्यापारी सुविधांच्या उन्नतीसाठी महत्त्वाचा निर्णय घेत छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलाच्या नूतनीकरणास तसेच उर्वरित विकासकामांना शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कामामुळे व्यापारी संकुल अधिक आधुनिक, सुरक्षित व सुसज्ज होणार असून व्यापारी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत.





भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ही माहिती दिली. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राहाता शहरातील विविध विकासकामांना सातत्याने गती मिळत असून, शहराच्या गरजेनुसार प्राधान्याने निधी व मंजुरी मिळवून दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. राहाता नगराध्यक्ष व नगरपरिषद सदस्यांच्या पाठपुराव्यामुळे या कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

या विकासकामांतर्गत व्यापारी संकुलातील आवश्यक दुरुस्ती, नूतनीकरण आणि प्रलंबित कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांना अधिक सुरक्षित व आधुनिक सुविधा उपलब्ध होतील, तर संकुलात येणाऱ्या नागरिकांनाही अधिक सोयी मिळतील. प्रशासकीय मान्यतेनंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे राहाता शहराच्या पायाभूत सुविधांना बळ मिळून व्यापारी आणि आर्थिक विकासाला नवी चालना मिळेल, असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

## बंदुकीचा धाक दाखवून अल्पवयीनवर अत्याचार

### आरोपीला नैसर्गिक मृत्यूपर्यंत सक्तमजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणे, बंदुकीचा धाक दाखवत विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी श्रीरामपूर येथील विशेष सत्र न्यायालयाने आरोपी योगेश सिताराम पाटेकर याला दोषी ठरवत नैसर्गिक मृत्यूपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच विविध कलमांन्वये स्वतंत्र शिक्षा आणि दंडही ठोठावण्यात आला आहे. विशेष सत्र न्यायाधीश एस. एन. साळवे यांनी हा निकाल दिला. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात ३ जून २०२४ रोजी भारतीय दंड विधानातील कलम ३६३, ३६६(अ), ३७६ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पॉक्सो) कायदा आणि भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब शिंदे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदवली. पीडिता अल्पवयीन असल्याचे, आरोपीने तिला फूस लावून बंदुकीचा धाक दाखवत पळवून नेले व विविध ठिकाणी तिच्यावर अत्याचार केल्याचे सरकारी पक्षाने न्यायालयात सिद्ध केले.

## वारकऱ्यांसाठी ६१ लाखाचा अतिरिक्त निधी : ना. विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने'अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्याला ६१ लाख ७६ हजार रुपयांचा अतिरीक्त निधी मंजूर झाला असल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून विश्वगुरू संत निवृत्ती महाराज, संत श्री एकनाथ महाराज, श्री संत निळोबाराय महाराज व श्री ज्ञानेश्वर आषाढी वारी पालखी (नेवासा) यांच्या बरोबरच अन्य पालख्याही पंढरपूरकडे प्रस्थान करतात.

या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी तात्पुरती शौचालये, स्वच्छतागृहे, स्नानगृहे बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय, वैद्यकीय सुविधा, औषधे पुरवणे तसेच जलरोधक मंडप उभारणी करिता यापुर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता.

राज्यातील महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत अधिकचा निधी मंजूर व्हावा अशी विनंती मंत्री विखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना केली होती.

मागील दोन वर्षांपासून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील पालख्यांना आणि वारकऱ्यांना यावर्षीही प्रशासनाच्या माध्यमातून चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या.

त्यानूसार महायुती सरकारने अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. आषाढी वारीत अहिल्यानगरच्या पालख्यांचा मान महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यां करिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मंत्री विखे यांनी आभार मानले आहेत.

## प्रामाणिकपणाचा आदर्श नजरचुकीने मिळालेले १० हजार बँकेला परत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूरचे राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील सयाराम पाटील बानकर यांनी प्रामाणिकपणाचा उत्तम आदर्श समाजासमोर ठेवला आहे. युनियन बँक ऑफ इंडियाच्या सोनई शाखेकडून नजरचुकीने त्यांना ५०० रुपयांच्या नोटांचे एक बंडल म्हणजेच अतिरिक्त १० हजार रुपये मिळाले होते.



हा प्रकार लक्षात येताच त्यांनी कोणताही विलंब न करता बँकेशी संपर्क साधून ती रक्कम स्वतः बँकेत जाऊन परत केली. त्यांच्या या जबाबदार व प्रामाणिक कृतीमुळे बँकेच्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून बँक शाखेत विशेष सत्कार आयोजित करण्यात आला. यावेळी 'सोनईरत्न' चंद्रकांत आघाव गुरुजी यांच्या हस्ते सयाराम बानकर यांना विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. शाखाधिकारी गणेश देशमुख यांनी बानकर यांनी आदर्श संस्काराची परंपरा कायम ठेवल्याचे सांगितले.

## इनरव्हील क्लबवतीने मुठेवाडगाव येथे ५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे मोफत वाटप





प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** इनरव्हील क्लब श्रीरामपूरच्या वतीने बेलापूर एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूल, मुठेवाडगाव येथील ५० आर्थिकदृष्ट्या मागास व गरजू विद्यार्थ्यांना नुकतेच शालेय दप्तरांचे मोफत वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लावण्यासाठी क्लबतर्फे हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. यावेळी राखी बिहाणी, सचिव डॉ. रितु लखोटिया, उपाध्यक्षा सुप्रिया भोसले, पद्मा भूतडा, प्रतिभा शिंदे आणि निशा खटोड, मुख्याध्यापक महेश काशिद, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा राखी बिहाणी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मोलाचा उपदेश दिला. त्या म्हणाल्या,जीवनात कितीही मोठे यश संपादन केले, तरी आपल्याला लहानाचे मोठे करणाऱ्या आई-वडिलांना आयुष्यात कधीच विसरू नका. यावेळी क्लबच्या उपाध्यक्षा सुप्रिया भोसले यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा करताना सांगितले की, भविष्यात बेलापूर एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूल, मुठेवाडगाव ही शाळा दत्तक घेऊन येथील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सर्वतोपरी मदत केली जाईल.

## औद्योगिक वसाहतीत भूखंड वाटपात घोटाळा !

**नगर तालुका :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अहिल्यानगर कार्यालयातील अधिकाऱ्यांनी शासकीय दुध डेअरीचा भूखंड नियमबाह्य पद्धतीने उपविभाजित संगनमताने १५ जणांना वाटप केल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी केला आहे. परकाळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी मुंबई यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सन १९८० मध्ये दुध डेअरीसाठी मंजूर झालेला अखंड भूखंड महामंडळाने परत ताब्यात घेतला. त्यानंतर अवघ्या ४६ दिवसांत फेब्रुवारी २०२४ मधील नवीन अर्जांद्वारे भूखंड वाटप करण्यात आले. यामध्ये नियमांचे उल्लंघन करण्यात आले असून नियमानुसार मोठ्या भूखंडाचे उपविभाजन करण्यापूर्वी मंजुरी, नाशिक उपसंचालक व मुख्यालयाच्या नियोजन विभागाची मान्यता आवश्यक आहे. भूमापकांनीही तसा अभिप्राय दिला होता. मात्र मान्यता नसतानाही २०२४ मध्ये रोजी प्रस्ताव पाठवून १५ मार्च २०२४ रोजी थेट ऑफर लेटर देण्यात आली. रेखांकन मंजुरीशिवाय वाटप करणे अवैध आहे. याठिकाणी नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे. . सन २०२० पासून उद्योग विस्तारासाठीचे पाच प्रलंबित अर्ज डावलून नवीन अर्जदारांना प्राधान्य दिले. ऑनलाईन पोर्टल जाणूनबुजून बंद ठेवून रात्री उशिरा सुरू करून संगनमताने अर्ज भरले असून पारदर्शकपणे कामकाज केलेले नाही. तसेच सदर भूखंडावरील एक हजार पेक्षा जास्त जुनी झाडे, साग-चंदनासह मौल्यवान झाडांची नोंद न घेता केवळ २४५ झाडे दाखवून खोटा पंचनामा करण्यात आला.

## टेंभुर्णीत ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे दुसरे रिंगण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** पंढरीच्या वाटेवर असलेल्या टेंभुर्णी येथे नेवासा येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.शिवतीर्थाच्या प्रांगणात ज्ञानोबा माऊली तुकारामच्या जयघोषात दिंडीतील दुसरे गोल रिंगण हजारो वारकरी व गावकरी भाविकांच्या उपस्थितीत साजरे झाले.या रिंगण सोहळयामुळे टेंभुर्णीतील वातावरण विठ्ठलमय व माऊलीमय बनले होते



ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे प्रमुख वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या रिंगण सोहळयाच्या प्रसंगी माऊली माऊली व ज्ञानोबा माऊली तुकारामचा जयघोष,टाळ मृदुंगाचा एका तालातील गजर उपस्थित हजारो वारकऱ्यांना पहावयास मिळाला. रिंगण मैदानात संजय कोकाटे यांनी पालखीचे पूजन करून दर्शन घेतले. येथे अश्वाचे पहिले रिंगण झाल्यानंतर सर्व झेंडेकरी, मृदंग वादक, टाळकरी, विणेकरी, फेटेकरी व तुळशी वृंदावन डोक्यावर घेतलेल्या महिलांचे रिंगण झाले. विठुरायाच्या भक्तिरसात रममाण झालेल्या ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्याचे दुसरे गोल रिंगण पहाण्यासाठी सुमारे १५ हजारांहून अधिक वारकरी व १० हजार स्थानिक ग्रामस्थ व इतर दिंड्यांतील वारकरी उपस्थित होते.हा क्षण डोळ्यात साठवतांना वारकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

टेंभुर्णी येथे झालेल्या रिंगण सोहळ्यात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्याचे प्रमुख वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या समवेत रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात यांची हरिनामाचा गजर करत फुगडी झाली. यावेळी सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धवजी महाराज मंडलिक,वाणीभूषण वेदमूर्ती भगवान महाराज जंगले शास्त्री,भागवताचार्य अंकुश महाराज जगताप यांनी पावली खेळली. राम महाराज झिंजुर्के यांनी रिंगण सोहळा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. गाथामूर्ती रामभाऊ महाराज राऊत यांच्या संस्थानच्या टाळकऱ्यांनी आनंदाचे खेळ केले.माऊलींचा रिंगण सोहळा हजारो वारकऱ्यांना सुखावून गेला.


## • निविदा सूचना •

**पढेगाव विकास सेवा सहकारी सोसायटी मर्या., पढेगाव**
**ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

पढेगाव विकास सेवा सहकारी सोसायटी मर्या., पढेगाव यांच्या वतीने ८० मेट्रिक टन क्षमतेचा इलेक्ट्रॉनिक वजन काटा (Weighbridge) पुरवठा, उभारणी, कार्यान्वित करणे तसेच आवश्यक सिव्हिल बांधकाम करण्यासाठी अनुभवी व पात्र उत्पादक/पुरवठादार/कंत्राटदार यांच्याकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**कामाचे स्वरूप :**

१. आवश्यक फाउंडेशन व सिव्हिल बांधकाम पूर्ण करणे.
२. ८० मेट्रिक टन क्षमतेचा इलेक्ट्रॉनिक वजन काटा पुरवठा.
३. वजन काट्याची उभारणी, बसविणे व कार्यान्वित करणे.
४. आवश्यक चाचणी, कॅलिब्रेशन व संबंधित विभागाकडील प्रमाणपत्र मिळवून देणे.
५. किमान १ वर्षाची वॉरंटी व विक्रीनंतरची सेवा उपलब्ध करून देणे.

**अटी व शर्ती :**

- निविदादाराने आवश्यक कागदपत्रे, जीएसटी नोंदणी, पॅन कार्ड, अनुभव प्रमाणपत्रे इत्यादी जोडणे आवश्यक आहे.
- सोसायटीला कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहील.
- अपूर्ण अथवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

| | |
|---|---|
| निविदा सादर करण्याची अंतिम तारीख : | १८/०७/२०२६ ते २५/०७/२०२६ |
| निविदा उघडण्याची तारीख : | २५/०७/२०२६, वेळ. सांय. ५.०० |
| निविदा सादर करण्याचे ठिकाण : | पढेगाव विकास सेवा सहकारी सोसायटी मर्या., पढेगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर |

**अध्यक्ष / सचिव** मो. ९९७०४६००६९
पढेगाव विकास सेवा सहकारी सोसायटी मर्या., पढेगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर

## श्रीरामपूरमध्ये बोगस डॉक्टर विश्वास खैरनार विरोधात गुन्हा

( पान १ वरुन) डॉ. संतोष सुभाष वैरागड यांना गजानन क्लिनिकमध्ये एक व्यक्ती कोणतीही अधिकृत वैद्यकीय पदवी नसताना बेकायदेशीरपणे नागरिकांवर उपचार करत असल्याबाबतची गोपनीय तक्रार प्राप्त झाली होती.या तक्रारीची गंभीर दखल घेत डॉ. वैरागड यांनी तातडीने पथकासह सदर क्लिनिकची पाहणी केली. चौकशीदरम्यान डॉ. सुवर्णा खैरनार यांच्या नावाचा व त्यांच्या लेटरपॅडचा गैरवापर करून विश्वास खैरनार हा स्वतः त्यांच्या खुर्चीवर बसून रुग्णांची तपासणी करत असल्याचे आणि त्यांना औषधोपचार देत असल्याचे उघडकीस आले. कोणतीही पात्रता नसताना लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या प्रकारानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात रितसर फिर्याद दाखल केली.ही धडक कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन आणि प्राथमिक आरोग्य केंद्र श्रीरामपूर यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## कमिशनच्या हव्यासापोटी सायबर भामट्यांना बँक खाते; व्यापाऱ्याविरोधात गुन्हा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** कमिशनच्या आमिषाला बळी पडून स्वतःचे चालू बँक खाते सायबर गुन्हेगारांच्या टोळीला वापरण्यास दिल्याप्रकरणी वैजापूर येथील व्यापाऱ्याविरोधात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. योगेश सुरेश सवई (वय ३०, रा. महाकाळ वाडगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे आरोपीचे नाव आहे.

सायबर पोलीस उपनिरीक्षक सुरेश नवले यांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर एनसीआरपी, समन्वय पोर्टल आणि 'मनी ट्रेल ॲनालिसिस'च्या माध्यमातून तांत्रिक तपास करण्यात आला. त्यात आरोपीच्या बंधन बँकेतील चालू खात्याचा वापर उत्तर प्रदेश, गुजरात व तेलंगणा येथील सायबर फसवणुकीतील रक्कम फिरवण्यासाठी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

तपासात आरोपीने मोठ्या कमिशनच्या मोबदल्यात हे खाते सायबर टोळीला उपलब्ध करून दिल्याचे समोर आले असून, त्याच्या मोबाईलवरून संशयित क्रमांकांशी सातत्याने संपर्क झाल्याचेही आढळले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१८(४), ६१(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, सायबर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## श्रीरामपूरमध्ये एसआयआर मोहीम वेगात; नागरिकांच्या सहकार्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील मतदारसंघातील केंद्रीय निवडणूक आयोगाची मतदार यादी पुनरिक्षण विशेष मोहीम सुरू असून ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. बीएलओ घरोघरी जाऊन भेटी देत आहेत. दुबार, तिबार आणि मयत मतदारांची नावे वगळून अचूक मतदार यादी तयार करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

नाव शोधताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी बीएलओ यांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रांताधिकारी किरण पाटील यांनी केले आहे. दरम्यान, कामात कसूर करणाऱ्या काही बीएलओंना समज देण्यात आली असून, शंभर टक्के काम पूर्ण करणाऱ्या दहा बीएलओंचा प्रशासनातर्फे सत्कार करण्यात आला आहे.

## घरासमोर लावलेली ॲक्टिव्हा जळून खाक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा येथील जुन्या बाजारपेठ परिसरात राहणारे किराणा व्यावसायिक योगेश डहाळे यांच्या मालकीची (एम. एच १७सीझेड ९६१६) क्रमांकाची ॲक्टिव्हा दुचाकी मध्यरात्रीच्या सुमारास आगीत पूर्णपणे जळून खाक झाल्याची घटना घडली. अज्ञात व्यक्तीने या दुचाकीला जाणूनबुजून आग लावल्याचा संशय योगेश डहाळे यांनी व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार डहाळे यांनी नेहमीप्रमाणे

आपली ॲक्टिव्हा राहत्या घरासमोर उभी केली होती. दरम्यान, रात्री अंदाजे दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास दुचाकीला आग लागल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच डहाळे यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत दुचाकी पूर्णपणे जळून राख झाली होती. या आगीची तीव्रता इतकी होती की शेजारी उभी असलेली शरद वाघ यांच्या मालकीची टीव्हीएस कंपनीची दुचाकीही काही प्रमाणात जळाली. मात्र स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे ही दुचाकी वेळेत आगीपासून दूर करण्यात आल्याने मोठे नुकसान टळले.

## कृषीदुतांच्यावतीने चिंचबन येथे लम्पी स्किन डिसीज प्रतिबंधासाठी लसीकरण प्रात्यक्षिके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** लम्पी स्किन डिसीज या संसर्गजन्य रोगापासून गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी ''गोवंशाचे गोटपॉक्स लसीद्वारे लसीकरण तयारी व लसीकरण प्रात्यक्षिक'' कार्यक्रम कृषी दूतांच्या वतीने करण्यात आला. मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषी महाविद्यालय, सोनई येथील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय चिंचबन येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते



प्रात्यक्षिकाच्या दरम्यान शेतकऱ्यांना लम्पी स्किन डिसीजची लक्षणे, रोगाचा प्रसार, आर्थिक परिणाम तसेच प्रतिबंधात्मक उपायांची सविस्तर माहिती देण्यात आली. गोटपॉक्स लसीची योग्य साठवणूक,सोडियम क्लोराईड मध्ये लस तयार करण्याची पद्धत, निर्जंतुकीकरण थंड साखळी राखण्याचे महत्त्व तसेच २१ दिवसांनी बूस्टर डोस देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित पशुपालकांच्या विविध शंकांचे समाधान करून नियमित लसीकरणामुळे लम्पी रोगाचा प्रादुर्भाव कमी होऊन जनावरांचे आरोग्य, दूध उत्पादन व आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होते अशी जनजागृती यावेळी करण्यात आली.कृषीदूत सोमेश्वर कोतकर, विजय गर्धे, अथर्व गोडसे, शेखर गायकवाड, राहुल गंगावणे व धनराज बांदल यांनी हा उपक्रम राबविला. कार्यक्रमास पशुवैद्यकीय डॉ. अमोल कोटकर, प्रगतशील शेतकरी दत्तात्रय सपकाळ, विराज शिंदे, प्राचार्य डॉ.एच.जी.मोरे,उपप्राचार्य डॉ. एस.व्ही.बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अनुप दरंदले कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. चौगुले, प्रा. नरेंद्र दहातोंडे, प्रा. दिशा चव्हाण तसेच विषय तज्ञ ज्योती शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## लिफ्टच्या बहाण्याने परप्रांतीय महिला मजुरावर अत्याचार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** कामाच्या शोधात महाराष्ट्रात आलेल्या मध्यप्रदेशातील २३ वर्षीय परप्रांतीय महिला मजुरावर लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दोन जणांनी लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना येवला तालुक्यातील गवंडगाव येथे घडली. याप्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून देवचंद भागवत आणि किरण पेटारे (दोघे रा. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यप्रदेशातील रीवा जिल्ह्यातील अटरिया येथील रहिवासी असलेली पीडित महिला पतीसह गेल्या दीड वर्षांपासून नाशिक, वैजापूर आणि मनमाड परिसरात मजुरीचे काम करत आहे. रविवारी (१९ जुलै) वैजापूर येथील मालकाकडे राहिलेले पैसे आणि साहित्य घेण्यासाठी ती आली होती. काम आटोपल्यानंतर मनमाडला परत जाण्यासाठी ती वैजापूर-येवला मार्गावर वाहनाची वाट पाहत उभी असताना आरोपींनी तिला मनमाडला सोडण्याचे सांगून दुचाकीवर बसवले. प्रवासादरम्यान पाऊस सुरू झाल्याचे कारण देत आरोपींनी तिला गवंडगाव येथील एका घरात नेले. तेथे दारू पाजल्यानंतर दोघांनीही तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेनंतर पीडित महिलेने आरडाओरड केल्याने परिसरातील ग्रामस्थ जमा झाले. याचा फायदा घेत तिने तेथून सुटका करून वैजापूर गाठले. सोमवारी तिने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शनैश्वर देवस्थानला ४९.२५ लाखांचे दान सोने, चांदीही अर्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील श्री शनैश्वर देवस्थानाच्या दानपात्रांची मोजणी शुक्रवारी (दि. १७) कार्यकारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. गेल्या पाच आठवड्यांत भाविकांनी अर्पण केलेल्या दानातून ४९ लाख २५ हजार ६४६ रुपयांची रोख रक्कम जमा झाली असून, त्याचबरोबर १७.५ ग्रॅम सोने व ४८२ ग्रॅम चांदीही दानपात्रातून प्राप्त झाली. शनी मंदिरासमोरील उदासी महाराज मठात सीसीटीव्ही देखरेख व व्हिडिओ चित्रीकरणाच्या साक्षीने दानपात्रांची मोजणी करण्यात आली. पारदर्शकता राखण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया भाविकांना पाहता येईल अशा पद्धतीने पार पडली. मंदिर परिसरातील १८ दानपात्रांमधील जमा रकमेची मोजणी करण्यात आली. मोजणीत ४६ लाख ७७ हजार ३४६ रुपयांच्या नोटा व २ लाख ४८ हजार ३०० रुपयांची चिल्लर आढळली. तसेच १७.५ ग्रॅम सोने (अंदाजे किंमत २ लाख २५ हजार १२० रुपये) आणि ४८२ ग्रॅम चांदी (अंदाजे किंमत ७८,३३७ रुपये) प्राप्त झाली. मोजणीनंतर जमा झालेली रक्कम देवस्थानच्या बँक खात्यात जमा करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार श्री शनैश्वर देवस्थानचा प्रशासकीय कारभार नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे असून, देवस्थानचे दैनंदिन कामकाज कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे पाहत आहेत.

**चोख सुरक्षा, कडक बंदोबस्त:** दानपात्र मोजणीवेळी देवस्थानचे सुरक्षा अधिकारी गोरख भीमाशंकर दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. तसेच शनिशिंगणापूरचे सहायक पोलीस निरीक्षक दिपक धनवटे यांच्या नेतृत्वाखाली मंदिर परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता .

## श्रीरामपूरात ७ हजार ७५० मालमत्ता धारकांचा वाढीव घरपट्टीला आक्षेप

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर -** वाढीव घरपट्टीच्या विरोधात श्रीरामपूर नगरपालिकेकडे ३२ हजार मालमत्ता धारकापैकी सुमारे ७ हजार ७५० जणांनी आक्षेप नोंदविला आहे. या सर्व हरकती संदर्भात नगरपालिकेचे कर्मचारी प्रत्यक्ष स्पॉटवर जाऊन पंचनामे करणार आहेत. शासनाच्या निर्देशानुसारच सदरची कर वसुली होत असून ती दर चार वर्षांनी केली जाते. १९ मे २०२३ मध्ये प्रशासकीय काळात या वाढीव घरपट्टी करासंदर्भात शासनाकडून नगरपालिकेला आदेश बजविण्यात आले होते. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही. दर चार वर्षांनी घरपट्टीची रिविजन व्हावी, असा शासनाचा नियम आहे. मुदतीत ती झाली नाही तर शासनाकडून मिळणारे निधी बंद होतील, असा फतवा शासनाने काढला आहे. हरकत घेणाऱ्या प्रत्येक नागरिकाला स्पेसिफिक कोणत्या कारणाने पट्टी वाढली आहे त्याचा पुरावा हरकती बरोबर जोडण्याची सूचना नगरपालिकेकडून करण्यात आली होती. वाढीव घरपट्टीच्या या नोटीस मध्ये अग्निशमन कर,विशेष शिक्षण कर, मागणी फि, नोटीस फी यामध्ये मोठी सवलत पालिकेकडून दिली असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान , कर वसुली संदर्भात कोणावरही अन्याय होणार नाही. विशेष सभा घेऊन हा प्रश्न सोडविला जाईल असे नगराध्यक्ष करण ससाणे, कर अधिकारी विकास घटकांबळे म्हणाले.

## भिंतीवर डोके आपटून पत्नीची हत्या,पतीला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** घरगुती वादातून पतीने पत्नीला मारहाण करून तिचे डोके भिंतीवर आपटून हत्या केल्याची घटना दि. १८ जुलै रोजी मध्यरात्री बुरुडगाव रोडवरील तांबे मळा येथे घडली. याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी पतीला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, मयत मनीषा खरात या आपल्या पती सुभाष खरात याच्यासोबत बुरुडगाव रोड येथील तांबे मळ्यात भाडोत्री राहत होत्या. दोघेही मूळचे सुशीवडगाव ता. गेवराई, जि. बीड येथील असून ते उदरनिर्वाहसाठी नगर येथे वास्तव्यास होते. त्यांच्या दोघांमध्ये घरगुती कारणावरून वारंवार वाद होत असल्याची माहिती पुढे आली आहे.

शनिवारी (दि. १८ ) मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास दोघांमध्ये जोरदार वाद झाला. त्यावेळी आरोपी पती सुभाष खरात यांनी पत्नी मनीषा यांना लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांचे डोके भिंतीवर आपटून गंभीर दुखापत केली. मारहाणीनंतर त्याने पत्नीला घराबाहेर टाकून घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान नातेवाईकांनी ही माहिती मनीषा यांच्या भाऊ गणेश अशोक घोडके यांना दिली . ते तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी मनीषा या बेशुद्ध आवश्यक पडलेल्या आढळून आल्या. त्यांनी तात्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना पाचारण केले तसेच रुग्णवाहिकेतून त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटने प्रकरणी गणेश घोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी सुभाष रखमाजी खरात याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नगर तालुका पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेऊन आरोपीला अवघ्या काही तासात अटक केली. ही कारवाई नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, महेश खरमाळे, विक्रांत भालसिंग आणि नितीन शिंदे यांनी केली.

## इगतपुरी कृषी संशोधन केंद्राचे काम शेतकरीभिमुख : कुलगुरू डॉ. विलास खर्चे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत इगतपुरी येथील विभागीय कृषी संशोधन केंद्राने आतापर्यंत भात व कारळ्याचे पाच वाण विकसित करून विविध पिकांसाठी ८० तंत्रज्ञान शिफारशी प्रसारित केल्या आहेत. केंद्राचे संशोधनकार्य उत्कृष्ट व शेतकरीभिमुख असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. कुलगुरू डॉ. खर्चे यांनी संशोधन केंद्राला भेट देऊन विविध उपक्रमांचा आढावा घेतला तसेच प्रक्षेत्राची पाहणी केली. त्यांनी भात, नागली, खुरासणी व वरई पिकांच्या प्रयोगांच्या रोपवाटिकांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांच्या हस्ते भात लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. भात शेतीतील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी यांत्रिकीकरणाचा अवलंब करण्याबरोबरच युरिया-डीएपी ब्रिकेटचा वापर वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी केंद्रावरील चाचणी प्रयोग व बियाणे उत्पादनाचा आढावा घेत संशोधन व विस्तार कार्याचे कौतुक केले. सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील यांनी केंद्राच्या बळकटीकरणासाठी करण्यात आलेल्या कामांची माहिती सादर केली. या प्रसंगी डॉ. आर. व्ही. पाटील, डॉ. सचिन हिरे, डॉ. अविनाश कोळगे, प्रा. रंगनाथ बागुल, डॉ. जयपाल चौरे, डॉ. राकेश सोनवणे, तालुका कृषी अधिकारी रामदास मडके तसेच शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य, प्रगतशील शेतकरी आणि संशोधन केंद्रातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते

## कृषी शास्त्रज्ञ डॉ. ढगे यांच्या 'कृषी तरंग' पुस्तकाचे प्रकाशन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा ।** तालुक्यातील खेडले काजळी येथील कृषी शास्त्रज्ञ तथा माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे लिखित 'कृषी तरंग' या पुस्तकाचे प्रकाशन अहिल्यानगर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे होते.



यावेळी माजी आमदार संभाजीराव फाटके, पांडुरंग अभंग, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, ज्ञानदेव पांडुळे, शब्दगंधचे संस्थापक सुनील गोसावी, रामराव पाटील भदगले, काशिनाथ नवले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिगंबर गोंधळी यांनी पोवाडा सादर केला.

पुस्तकाविषयी बोलताना डॉ. अशोकराव ढगे यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा वास्तववादी आढावा घेऊन त्यावरील उपाय मांडल्याचे सांगितले. शेतकऱ्यांसाठी सर्वसमावेशक संरक्षण कायदा होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी कृषी विद्यापीठाच्या संशोधन व विद्यार्थी कल्याण योजनांची माहिती दिली, तर माजी आमदार संभाजीराव फाटके आणि पांडुरंग अभंग यांनी शेतीमालाला योग्य भाव मिळण्याची गरज अधोरेखित केली.कार्यक्रमात कृषी क्षेत्रातील संशोधन, शेतकरी विकास आणि कृषी परिवर्तनावर सखोल विचारमंथन झाले. सूत्रसंचालन कवयित्री शर्मिला गोसावी यांनी केले, तर प्रकल्पाधिकारी प्रिया मते यांनी आभार मानले. समारंभास साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, कृषी तज्ज्ञ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ०८ ऑगस्टपूर्वी मतदार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करा : आ. कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनर्नरीक्षण मोहिमेअंतर्गत कोपरगाव मतदारसंघातील प्रत्येक पात्र मतदाराने ०८ ऑगस्ट २०२६ पूर्वी आपला एन्यूमरेशन फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन आमदार विवेक कोल्हे यांनी केले आहे.



मतदार यादी ही लोकशाहीचा मूलभूत आधार असून प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव अचूकपणे मतदार यादीत असणे अत्यंत आवश्यक आहे. या विशेष मोहिमेद्वारे मतदार यादीतील नाव, पत्ता, छायाचित्र तसेच इतर तपशीलांची पडताळणी केली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या बूथ लेव्हल ऑफिसर यांना आवश्यक सहकार्य करून एन्यूमरेशन फॉर्म वेळेत भरावा आणि आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असेही आमदार कोल्हे यांनी नमूद केले.

आमदार विवेक कोल्हे यांनी नागरिकांना प्रशासनाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करताना सांगितले,

नागरिकांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे आणि ०८ ऑगस्ट २०२६ पूर्वी सर्व प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी.तसेच प्रत्येक नागरिकाने ही माहिती आपल्या कुटुंबीय, नातेवाईक, शेजारी आणि इतर पात्र मतदारांपर्यंत पोहोचवून त्यांनाही वेळेत एन्यूमरेशन फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहनही आमदार विवेक कोल्हे यांनी केले आहे.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME ASHITOSH GANESH PATOLE (NAME AS PER SSC PASSING CERTIFICATE NO. 138440) TO NEW NAME AS ASHUTOSH GANESH PATOLE VIDE AADHAR NO. 3082 1936 5512.

**CHANGE OF NAME**

I have changed my name from HEMA PRAMOD NALKANGE to HEMLATA PRAMOD NARKANDE. Henceforth, I shall be known as HEMLATA PRAMOD NARKANDE for all purposes.

Place: Newasa Date:


## बाळूमामा मंदिरात तब्बल ६० कोटींचा महाघोटाळा तपासासाठी आलेल्या महिला ऑफिसरने मारला डल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हापूर :** बाळूमामा देवस्थान (आदमापूर) मंदिरात ६० कोटी रुपयांचा महाघोटाळा उघडकीस आला असून या प्रकरणात थेट उपनिबंधक रागिणी खडके आणि देवस्थान समितीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्या अधिकाऱ्याची नियुक्ती मंदिर प्रशासनातील पारदर्शकता आणि तपासणीसाठी करण्यात आली होती, त्यांनीच या घोटाळ्यात मुख्य भूमिका बजावल्याचे समोर आल्याने संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार आरोपींनी मंदिराच्या आर्थिक व्यवहारांमध्ये आणि मालमत्तेच्या नोंदींमध्ये बनावट कागदपत्रे व दस्त तयार करून मोठ्या प्रमाणावर फेरफार केला.मंदिराच्या खात्यातील आणि भाविकांनी दिलेल्या दानातील तब्बल ६० कोटी रुपयांचा निधी बेकायदेशीरपणे वळवण्यात आला. उपनिबंधक या शासकीय पदावर कार्यरत असणाऱ्या रागिणी खडके यांच्याकडे देवस्थानच्या कारभारावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी होती. मात्र, तपासणीच्या नावाखाली त्यांनीच पदाचा गैरवापर करत हा घोटाळा घडवून आणला.

श्री संत बाळूमामा यांच्या आदमापूर येथील मंदिराला दरवर्षी लाखो भाविक भेट देतात आणि कोट्यवधींचे दान जमा होते. भाविकांच्या श्रद्धेचा आणि




पैशाचा असा गैरवापर झाल्याचे समोर आल्याने वारकरी संप्रदाय व भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तपास यंत्रणांकडून या प्रकरणातील मूळ दस्तऐवजांची पडताळणी सुरू असून घोटाळ्याची व्याप्ती आणि यातील इतर सहभागी व्यक्तींची नावे लवकरच समोर येण्याची शक्यता आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

**बुधवार दि .२२ जुलैं २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

२३४ ४९० ६७० | ३-२ | १५६ १२९ १७०

जोड ३०-७२-४१-६५-२८

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१४० ७८० ६९० | ५-३ | १२० ६७० ५८०

जोड ५७-६३-९८ १२-३४

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१५० १६९ ११४ | ६-७ | १२४ १७५ ११५

जोड ६३-४७-१०-२९-७५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

# दिल्लीतील लाठीचार्जच्या निषेधार्थ एल्गार

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी




### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने, ३१ जुलैला महामोर्चाचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** देशातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि सकारात्मक बदल घडवून आणणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे तसेच राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा संदर्भातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अहिल्यानगरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी आंदोलनात सहभागी युवक-युवतींवर केलेल्या कथित लाठीचार्जचा निषेध व्यक्त करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक-युवती, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान सहभागी नागरिकांच्या हातात तिरंगा ध्वज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शहीद भगतसिंह यांच्या प्रतिमा होत्या. मोदी सरकार चले जाव, हमे चाहिए आजादी अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. युवकांनी डफाच्या तालावर गीत सादर करत घोषणाबाजी केली. यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे फलकही झळकविण्यात आले.

आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट परीक्षेचा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणामुळे देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. या घटनेनंतर अनेक संघटनांनी आंदोलन केले. त्याच पार्श्वभूमीवर दिल्लीच्या जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे.

या आंदोलनाला पाठिंबा म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ सोनम वांगचुक, नेहा बोरा, दानिश ली, मनीष सिंग यांच्यासह अनेक विद्यार्थी अन्नत्याग उपोषण करत असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. हे आंदोलन अनेक दिवसांपासून सुरू असून उपोषणाच्या २१व्या दिवशी दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने ताब्यात घेतल्याचा तसेच त्याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

शांततापूर्ण आणि संविधानाच्या चौकटीत सुरू असलेल्या आंदोलनावर दडपशाही करण्यात आल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला. विद्यार्थ्यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनाला दडपण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पंतप्रधानांना निवेदन पाठविण्यात आले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तातडीने राजीनामा घेऊन विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर निर्णय न झाल्यास येत्या ३१ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य महामोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

# साईसेवेचा मेवा पुढाऱ्यांनी खाल्ला

## विनातारण कर्जे, कमी व्याज, 'सेटलमेंट'चा खेळ

### हजारो ठेवीदारांच्या आयुष्यभराच्या बचती अडकल्या



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील साइसेवा बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्था आणि साइसेवा मल्टिस्टेटच्या कथित आर्थिक घोटाळ्याने आता गंभीर वळण घेतले असून, संस्थेतील आर्थिक गैरव्यवहारामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप ठेवीदारांकडून होत आहे. प्रभावशाली नेत्यांना विनातारण, विनाजामीनदार कर्जे, कमी व्याजदर आणि कर्ज सेटलमेंटच्या विशेष सवलती देण्यात आल्याने संस्थेची आर्थिक घडी कोलमडली, तर त्याची किंमत सर्वसामान्य ठेवीदारांना मोजावी लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक कर्जप्रकरणांमध्ये नियमांना बगल देत मोठ्या रकमेची कर्जे मंजूर करण्यात आली. काही प्रकरणांत मूळ कर्जापेक्षा कमी रक्कम स्वीकारून सेटलमेंट करण्यात आल्याचाही दावा केला जात आहे. दुसरीकडे, ठेवी आकर्षित करण्यासाठी जादा व्याजाचे आमिष दाखवण्यात आले. चेअरमन, व्यवस्थापन आणि त्यांच्या नातेवाईकांना झालेल्या कथित कर्जवाटपाचीही चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, संस्थेच्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्यामुळे हजारो ठेवीदारांचे आयुष्यभराचे कष्टाचे पैसे अडकले आहेत. उपचार, शिक्षण आणि दैनंदिन गरजांसाठीही पैसे मिळत नसल्याने अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत.

आता ठेवीदारांची एकमुखी मागणी आहे की, राजकीय दबावाखाली मंजूर झालेल्या सर्व कर्जांची स्वतंत्र चौकशी करून लाभार्थ्यांची नावे जाहीर करावीत, नियमबाह्य कर्जवाटप करणाऱ्यांवर आणि त्याचा लाभ घेणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि दोषींची मालमत्ता जप्त करून ठेवीदारांचे पैसे परत द्यावेत.

# द•ख•ल

## पाण्यात बुडून ४ वर्षांच्या बालकाचा मृत्यू बोल्हेगाव परिसरातील घटना

**अहिल्यानगर :** शहरातील बोल्हेगाव परिसरात एक अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. पाण्यात बुडाल्यामुळे अवघ्या चार वर्षांच्या चिमुकल्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला आहे. साई विशाल पवार असे या मृत बालकाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बोल्हेगाव येथील भारत बेकरीजवळील आंबेडकर चौक परिसरात राहणारा साई पवार हा चिमुकला २० जुलै रोजी अचानक पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच त्याचे नातेवाईक विशाल वसंत पवार यांनी त्याला तातडीने उपचारासाठी शहरातील इंपल्स रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासून साई याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी इंपल्सचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच पो. नि. बालाजी वैद्य यांनी रुग्णालयात जाऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार दिनेश मोरे व विनोद गंगावणे करत आहेत.

## रिक्षाचालकाचा राडा: महिलेशी गैरवर्तन करून मुलाला दुचाकीसह उडवले

**अहिल्यानगर :** रेल्वेस्टेशन परिसरातील विद्या कॉलनी, गाडळकर मळा येथील सुलभ कन्स्ट्रक्शनजवळ एका अनोळखी रिक्षाचालकाने धुमाकूळ घातल्याची गंभीर घटना घडली आहे. घराजवळ थांबलेल्या एका महिलेला रिक्षाचालकाने हॉर्न वाजवून अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या घटनेमुळे घाबरलेल्या महिलेने लगेचच आपल्या मुलाला फोन करून मदतीसाठी घटनास्थळी बोलावून घेतले. महिलेचा मुलगा दुचाकीवरून घटनास्थळी पोहोचताच, संतापलेल्या रिक्षाचालकाने त्याच्याकडील रिक्षाने मुलाच्या दुचाकीला अत्यंत वेगात जोरदार धडक दिली. या अपघातात मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याच्या शाईन दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच या गोंधळात आणि धडकेच्या दरम्यान मुलाची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी गहाळ झाली आहे. घटना घडल्यानंतर आरोपी रिक्षाचालक घटनास्थळावरून रिक्षासह पसार झाला. घटनेनंतर जखमी मुलाला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे मुलावर आवश्यक उपचार पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराने कोतवाली पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अनोळखी रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पो.नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेकॉ शरद वाघ करत आहेत.

## जखणगाव ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे बबन कर्डीले, विजय जगताप यांच्यावर गुन्हा

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील जखणगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या मुख्य दरवाजाला बेकायदेशीरपणे कुलूप लावून शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायत अधिकारी राजेश एकनाथ तगरे (वय ४७, रा. टाकळीभान, ता. श्रीरामपूर) हे १८ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास जखणगाव ग्रामपंचायत कार्यालयात आपले दैनंदिन शासकीय काम करण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी बबन रावसाहेब कर्डीले आणि विजय मोहन जगताप (दोघे रा. जखणगाव, ता. जि. अहिल्यानगर) यांनी कोणतेही कारण नसताना ग्रामपंचायतीच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप ठोकले. कार्यालयाला कुलूप लावल्यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज बंद पडले. त्यामुळे अधिकारी तगरे यांच्या दैनंदिन शासकीय कामात अडथळा निर्माण झाला. या प्रकरणी फिर्यादी राजेश तगरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून नगर तालुका पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉ. शरद दाते करत आहेत.

## भिंगारमध्ये घातक शस्त्रासह तरुणाला अटक

**अहिल्यानगर :** भिंगार परिसरात एका तरुणाला बेकायदेशीररीत्या धारदार हत्यार आणि विनानंबर गाडी बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले आहे. बेलेश्वर मंदिरामागील काटवनातील मोकळ्या जागेत ही धडक कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, भिंगार येथील बेलेश्वर मंदिराच्या पाठीमागे असलेल्या काटवनात एक तरुण संशयितरीत्या थांबल्याची बातमी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कॅम्प पोलीस स्टेशनचे अंमलदार प्रमोद लहारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. त्यावेळी आलमगीर भागातील प्रबुद्धनगर येथे राहणारा अबरार मुक्तार शेख (वय २५) हा तेथे संशयित हालचाली करताना आढळून आला. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे सुमारे १५०० रुपये किमतीचा व ३३ सेमी लांबीचा धारदार चाकू मिळून आला. तसेच त्याच्या ताब्यात २० हजार रुपये किमतीची लाल रंगाची विनानंबर मोपेड गाडी आढळून आली.

# नीट पेपरफुटी विरोधात काँग्रेसची जिल्हाभर स्वाक्षरी मोहीम : चव्हाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नीट परीक्षा प्रक्रियेतील गंभीर अनियमितता, परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्नचिन्ह आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर काँग्रेसच्या वतीने विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी व्यापक जन आंदोलन उभारण्यात येणार असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी दिली.देशभरातील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असताना केंद्र सरकार आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी यांची भूमिका अत्यंत निराशाजनक असल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित इतका गंभीर विषय असतानाही केंद्र सरकारकडून कोणतीही नैतिक जबाबदारी स्वीकारली जात नसल्याचे त्यांनी म्हटले.या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून एक खुले पत्र प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात येणार आहे. तसेच परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या विश्वासाची पुनर्स्थापना करण्यासाठी व्यापक सुधारणा करण्याची मागणीही या पत्राद्वारे करण्यात येणार आहे.



याचबरोबर शहरातील विविध शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 'विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी स्वाक्षरी अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानासाठी १० बाय २० फूट आकाराच्या विशेष फ्लेक्सवर पंतप्रधानांना उद्देशून खुले पत्र प्रसिद्ध करण्यात येईल. उर्वरित जागेवर विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील. या स्वाक्षऱ्या राष्ट्रपती, पंतप्रधान आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती दीप चव्हाण यांनी दिली.या अभियानाचा एक भाग म्हणून शहरातील विविध भागांत जनजागृती रॅली, विद्यार्थी संवाद, स्वाक्षरी शिबिरे आणि नागरिकांशी प्रत्यक्ष संपर्क साधला जाणार आहे. शिक्षण हा राजकारणाचा विषय नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे.

# वारी म्हणजे केवळ भक्ती नव्हे, सामाजिक जबाबदारी : सपकाळ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय पंढरी वारी उत्साह, भक्तिभाव आणि समाजप्रबोधनाच्या वातावरणात पार पडली. भक्ती, सेवा, सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संगम या वारीतून सर्व सदस्यांना अनुभवायला मिळाला. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या सुरेल स्वरांत पंढरपूरकडे रवाना झालेल्या या दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी स्वच्छ वारी... सुंदर वारी हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.



भिंगार येथील श्री रोकडेश्वर हनुमान मंदिरात महाआरती करून हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्य बसने पंढरपूरकडे रवाना झाले. संपूर्ण प्रवासात विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. ज्ञानोबा-तुकोबा, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या गजरात वारकरी भक्तिभावाने तल्लीन झाले होते.

पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरी परिसरात सदस्यांनी हातात झाडू घेत स्वच्छता अभियान राबविले. परिसरातील प्लास्टिक, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी संजय सपकाळ, जहीर सय्यद, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, विकास भिंगारदिवे, रामनाथ गर्जे, सतीश सपकाळ, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, डॉ. अतुल मडावी, राजेंद्र पांढरे, अशोक लोंढे, अशोक दळवी, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, सुहास देवराईकर, मच्छिंद्र बेरड, रमेश साके, किसन गुंजाळ, राजेश तनपुरे, संतोष चोपडा, राजकुमार मोरे, उषाताई ठोकळ, सुरेखा आमले, नीता देवराईकर, उमा सोनसळे, आशा गर्जे, अश्विनी थोरात, रजनी परदेशी, लक्ष्मीताई गायकवाड, अनिता सोनवणे, योगिताताई, अर्चना खर्से, वर्षा काळे, रजनी परदेशी, निमल भिंगारदिवे, देविदास गंडाळ, विलास शिंदे, शब्बीर शेख, गोकुळ भांगे, दर्श गोंधळे, राजाराम थोरात, दत्तात्रय गोंधळे, हिरेंद्र मिश्रा, अनिल बनसोडे सहभागी झाले होते.

# शोरूममध्ये ग्राहकाला शिवीगाळ व धक्काबुक्की

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नवीन कारची लिक झालेली इंधन टाकी बदलून देण्याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या एका ग्राहकाला शोरूमच्या मॅनेजरसह कर्मचाऱ्याने शिवीगाळ करून धक्काबुक्की केल्याची खळबळजनक घटना अहिल्यानगरमधील केडगाव बायपास परिसरात घडली आहे. याप्रकरणी अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस ठाण्यात शोरूमचे मॅनेजर मोमीन सर आणि एका अनोळखी कर्मचाऱ्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस माहितीनुसार, सिद्धांत सुभाष आंधळे (वय २५, रा. कामरगाव, ता. जि. अहिल्यानगर) यांनी सन २०२४ मध्ये केडगाव बायपास येथील टाटा स्टर्लिंग शोरूममधून चारचाकी वाहन खरेदी केले होते. काही दिवसांपूर्वी या वाहनाची इंधन टाकी लिक असल्याचे सिद्धांत यांच्या निदर्शनास आले. त्यांनी शोरूम प्रशासनाकडे नवीन इंधन टाकी बसवून देण्याची मागणी केली होती. मात्र, अनेक दिवस उलटूनही शोरूमकडून टाकी बदलून दिली जात नव्हती. दरम्यान, २० जुलै २०२६ रोजी सकाळी पावणेबाराच्या सुमारास सिद्धांत आंधळे हे या प्रकरणी विचारणा करण्यासाठी शोरूममध्ये गेले होते. त्यावेळी मॅनेजर मोमीन सर आणि त्यांच्या एका अनोळखी सहकाऱ्याने सिद्धांत यांच्याशी जोरदार वाद घातला. वादादरम्यान त्यांनी सिद्धांत यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. इतकेच नव्हे तर एका अनोळखी कर्मचाऱ्याने स्वतःच्या अंगातील टी-शर्ट काढून 'चल आता शोरूमच्या बाहेर, तुला दाखवतो' अशी जाहीर धमकी देऊन दमदाटी केली. या घटनेनंतर पीडित सिद्धांत आंधळे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी करत आहेत.

# दिल्लीतील लाठी हल्ल्याचा भाकपतर्फे निषेध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दिल्ली येथील जंतर-मंतरवर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शास्त्रज्ञ सोनम वांगचुक, विद्यार्थी नेत्या कॉ. नेहा बोरा, अभिजित दिपके आणि इतर आंदोलनकर्त्यांवर होत असलेल्या कथित लाठीचार्ज व दडपशाहीच्या निषेधार्थ भारतीचा कम्युनिस्ट पक्ष लिबरेशनच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने करून निषेध नोदविण्यात आला.




यावेळी आंदोलकांनी शिक्षणमंत्र्यांचा धिक्कार असो, मोदी सरकार हाय हाय, शिक्षण मंत्री राजीनामा द्या, आंदोलनकर्त्यांवरील दडपशाही बंद करा, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या सरकारचा धिक्कार असो अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. निदर्शनानंतर आंदोलकांच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेचे नायब तहसीलदार मयूर बेरड यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे. या आंदोलनात कॉ. राजेंद्र बावके, कॉ. राजू वैराळ, कॉ. मदिना शेख, कॉ. जीवन सुरुडे, कॉ. विनायक गोरखे, अनिल बोरसे,आकाश शिंदे, आसरू बर्डे, विजय राहीज, गणपत जाधव, बाळासाहेब खाडे, भास्कर जाधव, शिवाजी पवार, बजरंग गुंड, राहुल पवार कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'शेपिंग सस्टेनेबल एन्व्हलप' विषयावर मार्गदर्शन

**अहिल्यानगर :** आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एसा नॉलेज सिरीज' अंतर्गत 'शेपिंग सस्टेनेबल एन्व्हलप' या विषयावर प्रसिद्ध आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख यांचे व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. आधुनिक बांधकाम क्षेत्रात पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकास याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी आर्किटेक्ट आमेर अख्तर शेख म्हणाले की, पुढील पिढ्यांचा विचार करून पर्यावरणपूरक इमारतींची निर्मिती करणे.

# रामवाडी झोपडपट्टीत एसआयआरचे ८० टक्के काम पूर्ण




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण अभियानांतर्गत अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रामवाडी परिसरात तब्बल ८० टक्के पडताळणीचे काम पूर्ण करण्यात यश आले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि विविध अडचणींवर मात करत हे काम यशस्वी करणारे बीएलओ महेश क्षीरसागर व आसाराम गुंड यांच्या कार्याचा रामवाडीतील नागरिकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

रामवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा वेचक, असंघटित क्षेत्रातील कामगार, रोजंदारी मजूर, ज्येष्ठ नागरिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे वास्तव्यास आहेत. येथील बहुतांश नागरिक सकाळी लवकर कामासाठी घराबाहेर पडतात आणि रात्री उशिरा घरी परततात. त्यामुळे विशेष मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेअंतर्गत त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पडताळणी करणे हे मोठे आव्हान ठरत होते.

# अनैतिक व्यापारावर प्रशासनाचा दणका

## काष्टीतील 'आम्रपाली' व बनपिंप्रीतील 'सुप्रीम' हॉटेल कायमस्वरूपी बंद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील आम्रपाली हॉटेल तसेच बनपिंप्री येथील सुप्रीम हॉटेल येथे अनैतिक व्यापार सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर प्रांताधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी दोन्ही हॉटेले अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ च्या कलम १८ अन्वये कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी या ठिकाणी हॉटेल आम्रपाली रेस्टॉरंट आणि बार तसेच बनपिंप्री परिसरातील हॉटेल सुप्रीम बंद करण्याचं आदेश प्रांताधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी दिले असून या दोन्ही हॉटेलांवर श्रीगोंदा पोलिसांनी यापूर्वी छापे टाकून अनैतिक व्यापार प्रकरणी गुन्हे दाखल केले होते. त्यानंतर संबंधित पक्षांना सुनावणीची संधी देण्यात आली. सुनावणीनंतर उपलब्ध पुरावे व पोलिसांच्या अहवालाच्या आधारे प्रांताधिकाऱ्यांनी कठोर निर्णय घेत दोन्ही आस्थापना बंद करण्याचे आदेश पारित केले.या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी श्रीगोंदा पोलिसांवर सोपविण्यात आली असून, अनैतिक व्यापाराला पाठीशी घालणाऱ्या आस्थापनांवर प्रशासन कोणतीही दया दाखविणार नसल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.या निर्णयामुळे श्रीगोंदा तालुक्यात अवैध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली असून, बेकायदेशीर व अनैतिक व्यवसायांविरोधातील ही मोठी प्रशासकीय कारवाई मानली जात आहे.श्रीगोंदा पोलिसांनी केलेल्या कारवाईत हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय चालत असल्याचा आरोप नोंदविण्यात आला होता. या प्रकरणात हॉटेल चालक, व्यवस्थापक तसेच इतर संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि अनैतिक व्यवसाय (प्रतिबंध) अधिनियमातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित पक्षांना सुनावणीची संधी दिल्यानंतर उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी आदेश पारित करत संबंधित जागा एक वर्षासाठी बंद (सील) ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी श्रीगोंदा पोलिसांवर सोपविण्यात आली आहे.या कारवाईमुळे श्रीगोंदा शहरात अनैतिक व्यवसायांविरोधातील प्रशासनाच्या भूमिकेची जोरदार चर्चा सुरू झाली असून, अशा प्रकारच्या बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिल्याचे मानले जात आहे.

# नवरंग व्यायामशाळा परिसरातील रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील तोफखाना नवरंग व्यायामशाळा परिसरातील रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कामामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार असून परिसराच्या विकासाला नवी गती मिळणार आहे. भूमिपूजन प्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विकासकामांचे स्वागत केले. यावेळी मनपा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, महापालिका निवडणुकीत भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस युतीला नागरिकांनी विकासाच्या मुद्द्यावर कौल दिला असून त्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. शहरातील प्रत्येक प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत टप्प्याटप्प्याने सर्व विकासकामे पूर्ण केली जात आहेत.

द•ख•ल

## आळेफाटा चौकात खड्ड्यांचे साम्राज्य,

### अहिल्यानगर-कल्याण महामार्गाची दुरावस्था, प्रशासनाचे दुर्लक्ष



**आळेफाटा** : अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील आळेफाटा (ता. जुन्नर )चौकातील रस्त्याची दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून डांबर उखडले आहे. त्यामुळे दुचाकीधारक आणि चारचाकी वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती न झाल्याने खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. रात्रीच्या वेळी हे खड्डे न दिसल्याने अपघात होण्याची भीती आहे. आळेफाटा हे जुन्नर, नारायणगाव, अहिल्यानगर आणि कल्याणकडे जाणाऱ्या वाहतुकीचे महत्त्वाचे जंक्शन आहे. येथून रोज हजारो ट्रक,कार,एसटी आणि प्रवासी वाहने जातात. मात्र खराब रस्त्यामुळे वाहतूक कोंडी आणि वेळेचा अपव्यय होत आहे. ''महिन्यातून दोनदा टायर बदलावा लागतोय. संबंधित प्रशासनाला तक्रार करूनही कोणी फिरकत नाही,'' अशी प्रतिक्रिया येथील व्यावसायिकांनी दिली. प्रशासनाने तातडीने रस्त्याची डागडुजी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## वळती भोकरवस्ती येथे बाल दिंडी उत्साहात

**वळती** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोकरवस्ती (वळती) येथे आषाढी पालखी निमित्त इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा बाल दिंडी सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर वारकरी संप्रदायाच्या भक्तिरसाने भारावून गेला. शाळेच्या शिक्षिका स्नेहल लोखंडे आणि बाळासाहेब इदोरे यांनी आकर्षक पालखी सजवून दिंडीचे नियोजन केले. तसेच अंगणवाडी शिक्षिका



सुरेखा भोर व अंगणवाडी मदतनीस यांनीही उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेपासून गणेश मंदिर, भोकरवस्तीपर्यंत दिंडी काढण्यात आली. दिंडीदरम्यान पारंपरिक रिंगण सोहळाही पार पडला. या बाल दिंडी सोहळ्यात ज्येष्ठ वारकरी बबन भोर, नानाभाऊ जाधव, नरहरी भोर, अर्जून भोर, रामदास भोर, निखिल भोर, पवन शिंदे, सुरेश भापकर आणि बाबाजी भोर यांनी विशेष सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप देखील झाले.

## धमकी व खंडणी प्रकरणी एकावर गुन्हा

**सोमेश्वरनगर** - मिळालेल्या माहितीनुसार नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर याने स्वतःचा पोलीसांशी सबंध असल्याचे फिर्यादीस खोटे भासवून, फिर्यादीवर बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन अंकीत करंजेपुल पोलीस दुरक्षेत्र येथे अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याबाबत खोटा गुन्हा दाखल होईल, झाला आहे व फिर्यादीला अटक होईल अशी फिर्यादी- विजय हिंदुराव साळुंखे वय ३६वर्षे, रा.वाघळवाडी भीती दाखवून, धमकी देवुन फिर्यादीकडून १२,००० रुपये खंडणी स्वरुपात उकळले आहे. तसेच पुन्हा पैशांची मागणी करून धमकी दिली आहे. व फिर्यादीकडुन खंडणी उकळण्याचा प्रयत्न करीत आहे.वगैरे मजकुराचे दिले फिर्यादीवरून विनोद नामदास रा.विकासनगर,वाणेवाडी यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०८(६)(७), ३५१(२)(३) व ३१९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचे गुन्ह्याचा वर्दी रिपोर्ट मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो कोर्ट बारामती यांचे कोर्टात रवाना करण्याची तजवीज ठेवलेली आहे. पुढील तपास वडगांव निंबाळकर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस नरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय दीपक वारुळे व पोलीस हवालदार पन्हाळे हे करत आहे.

## अनेकान्त' स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचा शपथविधी सोहळा

**बारामती** : अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या विद्यार्थी परिषद (ड्रींवशर्पीं ऊेपलळश्र) निवड व शपथविधी सोहळा नुकताच अतिशय उत्साहात पार पडला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.. स्वरूप शहा (वाघोलीकर) आणि सौ. ऋजुता शहा उपस्थित होते. त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांची जाणीव करून दिली, तसेच विद्यार्थी दशेपासूनच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावेत यासाठी त्यांना मोलाचे मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. 'सर्वेश' आणि 'कृतिका'कडे मुख्य प्रतिनिधीत्व या परिषदेमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सर्वेश सचिन सोन्ना आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून कृतिका मंदार गांधी यांची निवड करण्यात आली. चारही हाऊसच्या कॅप्टन्सचा शपथविधी शाळेतील 'ॲमेझॉन, ईडन, महानंदा आणि सतलज' या चारही हाऊसच्या कॅप्टन व व्हॉईस कॅप्टन पदांसाठी निवड करण्यात आली. नवनियुक्त प्रतिनिधींना त्यांच्या पदाची आणि गोपनीयतेची शपथ देण्यात आली.

# बारामती एमआयडीत १ हजार वृक्ष लागवडीचे नियोजन

## 'स्वच्छ, सुंदर व हरित बारामती' संकल्पनेला पूरक उपक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती** : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती कॅटलफिडस् प्रा. लि.च्यावतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरात १ हजार वृक्ष लागवडीचे नियोजन आले आहे. वृक्ष लागवड कार्यक्रमाचा प्रारंभ २२ जुलै पासून करण्यात येणार आहे, अशी माहिती बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी दिली आहे.

एम.आय.डी. सी. परिसरातील बिरोबा मंदिर परिसरात १५०, एम. आय. डी. सी. फेज २ वॉटर टँक परिसरात १७५, ग्रामपंचायत वंजारवाडी येथे १०० तसेच एम. आय. डी. सी. फेज २ ग्रामपंचायत कटफळ येथे ५७५ झाअडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'स्वच्छ, सुंदर आणि हरित बारामती' दूरदृष्टीचा व एक महत्त्वाचा संकल्प होता. पर्यावरण संवर्धन व हरित क्षेत्र वाढीसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून स्थानिक प्रशासन व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून वृक्षारोपणाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. कुरकुंभ एमआयडीसी परिसरात दोन हजार वृक्षांची लागवड...आज एमआयडीसी कार्यालय बारामती आणि रोटरी कल्ब, दौंड यांच्या संयुक्त विद्यमाने दौंड तालुक्यातील कुरकुंभ एमआयडीसी परिसरात दोन हजार वृक्षांची लागवड करण्यात आली, आगामी काळातही एमआयडीसी आणि सेवाभावी संस्था यांच्यासमवेत अधिकप्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती पाटील यांनी दिली आहे.



# सोमेश्वर विद्यालयात हरी नामाचा गजर...

## आनंद दिंडीचा उपक्रम उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील सोमेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सोमेश्वरनगर येथे आषाढी एकादशीचे औचित्य साधून 'विठ्ठल हरी नामाचा गजर... आनंद दिंडीचा' या सांस्कृतिक व आध्यात्मिक उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अभिरुप गोल रिंगण सोहळा विशेष ठरला. संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलनामाच्या गजराने, अभंगांच्या सुरांनी आणि वारकरी संस्कृतीच्या भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.



कार्यक्रमाची सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर संतांच्या विविध अभंगाचे गायन पार पडले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा स्पर्धा पार पडली. यानंतर विठू माऊली, रखुमाई माझी, अलंकापुरी अशा गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्ये सादर केली.

यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात आनंद दिंडी काढली. दिंडीत हरिनामाचा अखंड गजर करण्यात आला. याप्रसंगी संत सोपानकाका यांच्या रिंगण सोहळ्याप्रमाणे गोल रिंगण सोहळा पार पडला. यामध्ये वारकरी वेशभूषेत असलेले विद्यार्थी यांच्यासोबत शिक्षक, शिक्षिका यांनीही रिंगणातून धावण्याचा आनंद घेतला. अशा पद्धतीने संतांच्या विचारांवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विभागांनी मनापासून सहकार्य केले. विद्यार्थ्यांनीही अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली.विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख, संतांचे विचार आणि सामाजिक ऐक्याचे महत्त्व अनुभवण्याची संधी मिळाली.मुख्याध्यापक पी. बी. जगताप व पर्यवेक्षक जी.आर. इंगळे सर कार्यालयीन लेखनिक एस .एम.वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा पार पडला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुजाता जगताप यांनी केले सूत्रसंचालन राजेंद्र झूरंगे सर शेवटी उपस्थितांचे आभार विश्वास पवार यांनी मानले.

## वडिलांच्या त्रासाने हैराण अल्पवयीन मुलाला पोलिसांचा आधार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारगाव** : लोणी (ता. आंबेगाव) येथील १६ वर्षीय करण फुलमाळी याला वडिलांकडून होत असलेल्या त्रासामुळे अखेर पोलिसांची मदत घ्यावी लागली. वडिलांनी शिवीगाळ करत त्याचे कपडे जाळून टाकल्याने करणने तात्काळ पारगाव पोलीस स्टेशनशी संपर्क साधला. फोन आल्यानंतर अवघ्या दहा मिनिटांत सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत मुलाला मदतीचा हात दिला. सोमवारी (दि. २०) दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास करण फुलमाळी याने पोलीस स्टेशनला फोन करून वडिलांकडून सातत्याने होणारा त्रास, कपडे जाळून टाकल्याची घटना तसेच घरातून बाहेर पडल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याची संपूर्ण हकीकत शांतपणे ऐकून घेतली व त्याला धीर दिला. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी स्वतः पुढाकार घेत करणला आवश्यक कपडे खरेदी करून दिले. तसेच त्याला सुरक्षितपणे घरी पोहोचविण्यात आले. यावेळी कांडगे यांनी करणला मानसिक आधार देत भविष्यात कोणत्याही प्रकारची अडचण अथवा मदतीची गरज भासल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले.या संवेदनशील आणि तत्पर मदतीमुळे पारगाव पोलिसांच्या कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.



## महारक्त दान शिबिरात रक्तदात्यांसाठी यादगार तर्फे स्नेहभोज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती** : दिवंगत उपमुख्यमंत्री तथा विकासपुरुष स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महारक्तदान शिबिरात रक्तदात्यांच्या सेवेसाठी यादगार सोशल फाउंडेशनच्या वतीने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला रक्तदाते, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे १५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवत समाजसेवेचा आदर्श निर्माण केला.



रक्तदानासारख्या पवित्र कार्यासाठी आलेल्या रक्तदात्यांना भोजनाची उत्तम व्यवस्था करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यादगार सोशल फाउंडेशनच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. रक्तदात्यांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत संपूर्ण नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी यादगार सोशल फाउंडेशनच्या सर्व सभासदांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. विशेषतः अन्सारभाई आतार, गणेश सोनवणे, छगन आटोळे, सुभाष मोहिते, प्रशांत महाडिक, ओंकार राऊत, ऋषिकेश हराळे, दादा मोडक, इरफान बागवान, अब्रार बागवान, जीशान बागवान, फारूक सय्यद आणि झहीर बागवान यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच अवेसभाई (भटारी) आणि त्यांच्या संपूर्ण टीमने स्वादिष्ट व दर्जेदार भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिरात रक्तदात्यांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभाग चे फिरोज अजिजभाई बागवान, नगरसेविका आफ्रीन फिरोज बागवान, माजी नगरसेवक अमजद अजिजभाई बागवान यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष किरण इंगळे तसेच पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमामुळे रक्तदानासारख्या सामाजिक चळवळीला अधिक बळ मिळाले असून, समाजहितासाठी सर्वांनी एकत्र येऊन केलेले कार्य हे इतरांसाठीही प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पुरग्रस्त वारकरी विद्यार्थ्यांच्या मदतीला 'वारी सत्कर्माची' शैक्षणिक साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी** : श्रीमंत माऊली प्रतिष्ठान व वारकरी संप्रदाय युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'वारी सत्कर्माची' या उपक्रमांतर्गत इंद्रायणी नदीच्या महापुरामुळे बाधित झालेल्या वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, जीवनावश्यक वस्तू तसेच किराणा मालाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांना संकटकाळात आधार मिळावा, या उद्देशाने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

या प्रसंगी ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले, आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, शिवसेना उपनेत्या शितल म्हात्रे, युवासेनेचे सचिव राज सुर्वे, मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेविका दीक्षा कारकर, माजी नगरसेवक हर्षद कारकर, अमर शहा, प्रिया आगणे, श्रीमंत माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनित आंगणे, उमेश महाराज बागडे, वेदमूर्ती निखिल प्रसादे, कमलेश तांडेल तसेच वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक, वारकरी साधक आणि विद्यार्थी उपस्थित होते.ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप म्हणाले, ''वारकरी संप्रदायाने समाजसेवा




आणि परोपकाराची परंपरा जपली आहे. पुरामुळे अडचणीत आलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे हीच खरी माऊलींची सेवा आहे. शिक्षणाचा प्रवास अखंड सुरू राहावा, यासाठी समाजाने अशा उपक्रमांना साथ द्यावी.''अक्षय महाराज भोसले म्हणाले, ''वारी ही समाजाला एकत्र आणणारी चळवळ आहे. भक्तीबरोबरच सेवाभावही वारकरी परंपरेचा आत्मा आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून समाजाप्रती असलेले कर्तव्य पार पाडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.''उपस्थित मान्यवरांनी अशा सेवाभावी उपक्रमांमुळे समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे सांगितले. या मदतवाटपामुळे पुरग्रस्त विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे एसआयआर मोहिमेला गती

## महाविद्यालयीन विद्यार्थी गणना पत्रे तपासणी, पडताळणी, नावे शोधणे व डिजिटल नोंदणी प्रक्रियेत बजावताहेत महत्त्वपूर्ण भूमिका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत असून, गणना पत्रांची छाननी, माहितीची पडताळणी, डिजिटल नोंदणी, दस्तऐवज तपासणी तसेच २००२ च्या मतदार यादीतील नावे शोधून मतदार आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना सहकार्य करण्याचे महत्त्वपूर्ण काम विद्यार्थी करत आहेत.

पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या या मोहिमेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी निवडणूक प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली जबाबदारीने कार्यरत आहेत. प्राप्त झालेल्या गणना पत्रांवरील माहिती तपासणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे, माहिती संगणकीय प्रणालीत नोंदविणे, अर्जांचे वर्गीकरण करणे यासोबतच २००२ च्या मतदार यादीतील संबंधित मतदारांची नावे शोधून त्याची पडताळणी करण्यात मतदार व बीएलओंना मदत केली जात आहे. त्यामुळे मतदार नोंदणी आणि पडताळणीची प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि अचूक होत आहे.

युवकांच्या सहभागामुळे मोहिमेतील कामकाज अधिक वेगाने आणि कार्यक्षमतेने होत असून, निवडणूक यंत्रणेवरील ताणही कमी झाला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अत्यंत जबाबदारीने आपली भूमिका बजावत असून, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नोंदणी प्रक्रियेलाही गती देत आहेत.

लोकशाही प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक व्यवस्थेबाबत जागरूकता वाढत आहे. मतदार नोंदणी प्रक्रियेचे महत्त्व, अचूक मतदार यादीची आवश्यकता आणि लोकशाहीतील नागरिकांची भूमिका यांची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळत आहे. त्याचबरोबर मतदारांशी संवाद साधताना त्यांच्यात नागरिक म्हणून जबाबदारीची जाणीवही अधिक दृढ होत आहे.

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासन, अधिकारी, कर्मचारी, बीएलओ आणि स्वयंसेवी



विद्यार्थ्यांचा समन्वय महत्त्वाचा ठरत असून, त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मोहिमेला अधिक गती मिळत आहे. विशेषतः २००२ च्या मतदार यादीतील नावे शोधून देण्याच्या विद्यार्थ्यांच्या कार्यामुळे मतदार पडताळणी प्रक्रिया अधिक परिणामकारक आणि सुलभ ठरत असल्याचे निवडणूक प्रशासनाने नमूद केले आहे

## अंगणवाडीच्या पोषण आहारात बदल; बालकांच्या ताटात आता शाकाहारी पुलाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : महिला व बालविकास विभागाने अंगणवाडीतील घरपोच पोषण आहार योजनेत महत्त्वाचे बदल केले असून, माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२६ पासून सुधारित पाककृतींचा पुरवठा केला जाणार आहे. बालके, गरोदर महिला आणि स्तनदा मातांना अधिक पौष्टिक, रुचकर व दर्जेदार आहार मिळावा, यासाठी शाकाहारी (व्हेज) पुलाव, बहुधान्य पौष्टिक पफ यांचा समावेश करण्यात आला असून खिचडीसोबत स्वतंत्र मसाल्याचे पाकीटही देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद खंडागळे यांनी दिली आहे.

महिला व बालविकास विभागाच्या सुधारित सूचनेनुसार पौष्टिक मूगडाळ खिचडी प्रीमिक्स हा पदार्थ कायम ठेवण्यात आला असून, त्यासोबत स्वतंत्र मसाल्याचे पाकीट दिले जाणार आहे. पौष्टिक तूरडाळ खिचडी प्रीमिक्स ऐवजी आता व्हेज पुलाव उपलब्ध करण्यात येणार आहे. पौष्टिक बहुधान्य-प्रथिन मिश्रण पाककृती पूर्ववत राहणार असून, भरडधान्ययुक्त बहुधान्य-प्रथिन मिश्रण ऐवजी बहुधान्य पौष्टिक पफचा समावेश करण्यात आला आहे. या सुधारित आहाराचा लाभ अंगणवाडीतील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना मिळणार आहे.

महिला व बालविकास विभागाने घरपोच पोषण आहार योजनेतील पाककृतींमध्ये बदल करण्यामागे लाभार्थ्यांना अधिक पौष्टिक, रुचकर आणि स्वीकारार्ह आहार उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. बालके, गरोदर महिला आणि स्तनदा माता आहार आवडीने खावेत, यासाठी व्हेज पुलाव आणि बहुधान्य पौष्टिक पफ यांचा समावेश करण्यात आला आहे.

**श्रीमती अंकिता पाटील, सभापती, महिला व बालविकास समिती:*

जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण भागात ४ हजार ३९५ अंगणवाड्या कार्यरत आहेत. या केंद्रांमार्फत जवळपास १ लाख ६ हजार बालके, तसेच



गरोदर महिला आणि स्तनदा माता यांना घरपोच पोषण आहाराचा लाभ दिला जातो. माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२६ महिन्यापासून सुधारित घरपोच पोषण आहाराचा पुरवठा केला जाणार आहे. लाभार्थ्यांना अधिक पौष्टिक व चविष्ट आहार मिळावा, या उद्देशाने व्हेज पुलाव, मल्टीग्रेन न्युट्री पफ आणि स्वतंत्र मसाला पाकिटाचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये या सुधारित 'खाद्यसूची'नुसार पुरवठा सुनिश्चित करण्यात येईल.

## हुतात्मा उमाजी नाईक विद्यालयात गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस** : पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील श्री दत्त शिक्षण संस्थेच्या हुतात्मा उमाजी नाईक माध्यमिक विद्यालयात विविध स्पर्धा परीक्षा, वैद्यकीय, प्रशासकीय, उद्योग क्षेत्रात विशेष नाव कमावणाऱ्या विद्यालयाच्या माजी विद्यार्थी तसेच निवडून आलेले लोकप्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष शामकांत भिंताडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कौतुक सोहळ्यास जेष्ठ उद्योजक साहेबराव भिंताडे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते.

जिल्हा परिषदेवर निवडून आलेले हरिभाऊ लोळे, पंचायत समितीवर निवड झालेल्या सायली मनोज शिंदे यांसह सुमित भिंताडे, आकांक्षा जैनक, राकेश औचरे, डॉ अविनाश क्षीरसागर, समृद्धी औचरे यांसह अनेकांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी यापुढे कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी, उदयाचा भविष्य काळ तुमचाच आहे असे विचार साहेबराव भिंताडे यांनी व्यक्त केले. शामकांत भिंताडे, हरिभाऊ लोळे, डॉ मनोज शिंदे, अक्षय शिंदे, प्रशांत वांढेकर,, केशव दिघे, मनोहर क्षीरसागर, सदाशिव दिघे आदिनी या प्रसंगी मनोगते मांडली. याच कर्यक्रमात साहेबराव भिंताडे यांनी वाचनालयाच्या इमारतीसाठी ६ लाख ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली व त्यापैकी साडेतीन लाखाचा धनादेश सुपूर्द केला.

कार्यक्रमांस ग्रामस्थ, विद्यार्थी, सत्कारार्थी विद्यार्थ्यांचे पालक, नातेवाईक, मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधाकर जगदाळे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्तविक केले. प्रवीण तांदळे यांनी सूत्रसंचालन व संजय कटके यांनी आभारप्रदर्शन केले

# शेवगावला ‘राजमाता जिजाऊ’ बस दाखल!

## आ. राजळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** आषाढी एकादशीपूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शेवगाव आगारात नव्या ५ बीएस-६ राजमाता जिजाऊ बस दाखल झाल्या आहेत. या बस उद्यापासून नियमित प्रवासी सेवेत दाखल होणार असून ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचा लाभ मिळणार आहे.



शेवगाव व पाथर्डी आगारासाठी प्रत्येकी १० नवीन बस उपलब्ध करून देण्याची मागणी आ. मोनिका राजळे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत पहिल्या टप्प्यात शेवगाव आगारासाठी ५ नवीन बस मंजूर करण्यात आल्या असून त्या आता आगारात दाखल झाल्या आहेत. उर्वरित बसही दोनही आगारासाठी लवकरच उपलब्ध होणार आहेत

सध्या शेवगाव आगारात ५२ बस कार्यरत असून या बसमधून दरवर्षी सुमारे सहा लाख प्रवासी प्रवास करतात. यापैकी अनेक बस जुन्या झाल्यामुळे प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन नवीन बस उपलब्ध करून देण्यासाठी आ. मोनिका राजळे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

यापूर्वीही आ. राजळे यांच्या प्रयत्नांतून बीएस-६ प्रकारातील अशोक लेलँड कंपनीच्या १० नवीन बस शेवगाव आगाराला मिळाल्या होत्या. त्यामध्ये ११ फेब्रुवारी २०२५ रोजी ५ बस आणि ५ मार्च २०२५ रोजी आणखी ५ बस आगारात दाखल झाल्या होत्या. आता नव्याने ५ बस दाखल झाल्याने शेवगाव आगाराच्या ताफ्यात आणखी भर पडली आहे.

यावेळी आ. मोनिका राजळे यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून शेवगाव आगाराचे शेड व बसस्थानकाचे काम पूर्णत्वास आले आहे. नव्याने दाखल झालेल्या राजमाता जिजाऊ बीएस-६ बस विशेषतः ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सोयीचा विचार करून तयार करण्यात आल्या असून सुरक्षितता, आरामदायी आसनव्यवस्था आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आ. मोनिका राजळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शेवगाव आगारासाठी नवीन बस उपलब्ध करून देण्यास दिलेल्या सकारात्मक सहकार्याबद्दल मनः पूर्वक आभार व्यक्त केले. भविष्यात उर्वरित बसही लवकरच उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवीन बस आगारात दाखल झाल्याने प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## केडगावच्या श्री गणेश पायी दिंडीचे प्रस्थान

**अहिल्यानगर :** केडगाव येथून सालाबाद प्रमाणे श्री गणेश पायी दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पूजन होवून दिंडी मार्गस्थ झाली. यावेळी विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. ज्ञानोबा-तुकोबा, माऊली... माऊली... या जयघोषात टाळ-मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि भक्तीचा अविस्मरणीय सोहळा रंगला होता. दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक सुजय मोहिते, नंदकुमार बोरुडे, दिंडी चालक ह.भ.प. गणेशानंद महाराज शेंडे, सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिस्तबद्धता व स्वच्छतेमुळे खडकीच्या कैकाडी महाराज दिंडीचे कौतुक



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** आषाढी वारीनिमित्त खडकी येथील श्री. वैराग्य मूर्ती कैकाडी महाराज पायी दिंडी सोहळ्याचे मार्गक्रमण सुरू आहे.भक्ती ,शिस्त,स्वच्छता, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी जपत मार्गक्रमण करणाऱ्या या दिंडीचे कौतुक होत आहे. आपला कचरा आपली जबाबदारी या सूत्रानुसार होणाऱ्या कचऱ्याची स्वच्छता दिंडीतील वारकरी आणि सेवेकरी करत असल्याने मुक्काम गावांमध्ये या वारकऱ्यांनी आपुलकीचे नाते निर्माण केले आहे. खडकीपासून सुरू झालेल्या या पायी दिंडीचा प्रवास कोळगाव, आढळगाव, कुळधरण, राशीन, वीट, कंधर, घोटी, पांढरेवाडी आणि त्यानंतर श्री क्षेत्र पंढरपूर असा होत आहे.

या संपूर्ण वारीदरम्यान दिंडीतील वारकरी आणि सेवेकरी शिस्तीचे काटेकोरपणे पालन करीत असून, प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छतेला विशेष महत्त्व दिले जात आहे.

वारी म्हटले की मोठ्या संख्येने वारकरी, भोजन व्यवस्था, नाश्ता, पिण्याचे पाणी आणि मुक्काम यामुळे मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होण्याची शक्यता असते. मात्र, या दिंडीने ‘आपला कचरा, आपली जबाबदारी’ ही भूमिका स्वीकारली आहे. ज्या गावात दिंडीचा मुक्काम होतो, त्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी जेवण व नाश्ता झाल्यानंतर निर्माण झालेला कचरा वारकरी आणि सेवेकरी स्वतः गोळा करतात. कचरा योग्य ठिकाणी जमा करून मुक्कामाचे ठिकाण स्वच्छ करूनच दिंडी पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होते.

## द•ख•ल

### रिफ्लेक्टर नसल्याने मालवाहतूक टेम्पो डिव्हायडरवर धडकला



**तिसगाव :** तिसगाव येथे सोमवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास तिसगावकडून नगरकडे जाणारा मालवाहतूक टेम्पो शासकीय विश्रामगृहादरम्यान असलेल्या डिव्हायडरवर जोरात धडकला. धडकेनंतर टेम्पो डिव्हायडरवर चढत पुढे गेला. या अपघातात टेम्पोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने जीवितहानी टळली.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित डिव्हायडरवर वारंवार अपघात होत असल्याने तेथील रिफ्लेक्टर व दिशादर्शक फलक पूर्णपणे खराब झाले आहेत. अद्याप ते दुरुस्त करण्यात आले नसल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना डिव्हायडरचा अंदाज येत नाही आणि अपघात घडत आहेत.तिसगाव-नगर मार्गावरील या धोकादायक ठिकाणी सातत्याने अपघात होत असूनही महामार्ग प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. यापूर्वी माजी सभापती काशिनाथ लवांडे, बिस्मिल्लाह इनामदार तसेच अन्य ग्रामस्थांनी महामार्ग प्रशासन व तहसीलदार यांना निवेदन देऊन रिफ्लेक्टर, इशारा फलक व अन्य सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. यापूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी या डिव्हायडरचे सुशोभीकरण करण्यासाठी ग्रामसेवकांना सूचना दिल्या होत्या. त्यानंतर किरकोळ स्वरूपाची कामे झाली; मात्र डिव्हायडरचे सुशोभीकरण व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत.

## संध्या सोनवणे यांच्या संकल्पनेतून तालुक्यात ’दादांची प्रतिमा’अभियान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विचार, कार्य आणि महाराष्ट्राच्या विकासातील योगदान समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्या कु. संध्याताई सोनवणे यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील सर्व शाळा तसेच विविध शासकीय कार्यालयांना दादांच्या प्रतिमांचे वितरण करण्यात आले. या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव होते. यावेळी धनंजय बोराडे, नगरसेवक महेश निमोणकर, बापूसाहेब शिंदे, गणेश काळे, सनी सदाफुले, अमित बोराटे, खैरे, भजनावळे, मिसाळ, युवराज पाटील, नारायण राऊत, मुकुंदराज सातपुते, केशवराज कोल्हे, संतोष डमाळे, कोपनर, अमोल पवार यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## टाळ-मृदंगाच्या निनादात बालसंस्कारांची पेरणी!

**दिंडी नव्हे... संस्कारांची चालती-बोलती शाळा !**

मोबाईल, सोशल मीडियाच्या आहारी जाणाऱ्या आजच्या पिढीसमोर भारतीय संस्कृतीचे जिवंत दर्शन घडविण्याचे काम यशश्री स्कूलच्या दिंडीने केले. संतांच्या विचारांची ओळख, हरिनामाचा गजर, सामूहिक शिस्त, भक्ती आणि सामाजिक ऐक्य यांचा अनुभव चिमुकल्यांना प्रत्यक्ष मिळाला. त्यामुळे ही दिंडी केवळ मिरवणूक न ठरता संस्कारांची चालती-बोलती शाळा ठरल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने अनेक शाळांमध्ये दिंडीचे आयोजन केले जाते. मात्र जेऊर येथील यशश्री प्री स्कूलने हा उपक्रम केवळ धार्मिक परंपरेपुरता मर्यादित न ठेवता बालसंस्कार, भारतीय संस्कृतीची ओळख आणि अध्यात्माची गोडी विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे प्रभावी माध्यम बनविले. त्यामुळे यशश्री स्कूलच्या चिमुकल्यांची दिंडी पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे विशेष आकर्षण ठरली.

यशश्री स्कूलच्या वतीने वर्षभर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे शाळेने तालुक्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर शाळेतील विद्यार्थ्यांची पारंपरिक दिंडी काढण्यात आली.

इमामपूर येथील प्रसिद्ध खिरणीचा महादेव मंदिर तसेच जेऊर येथील दत्त मंदिर या ठिकाणी दिंडीने दर्शन घेतले. टाळ-मृदंगाच्या गजरात अखंड हरिनामाचा जप, अभंग, भजन आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांच्यासह विविध संतांच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्यांनी उपस्थितांचे मन जिंकले. आजच्या धावपळीच्या आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली भारतीय परंपरा व संस्कार जपण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

## सातवड खंडोबाची वाडी रस्त्याची दुरावस्था



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** सातवड फाटा ते खंडोबाचीवाडी हा रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत तरी या रस्त्याचे काम तातडीने करावे अशी मागणी सातवड , खंडोबावाडी व कान्होबावाडी ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत सविस्तर असे की सातवड फाटा ढोलेश्वर ते खंडोबाची वाडी असा पाच किलोमिटरचा रस्ता आहे.या रस्त्यात जागोजागी खड्डे पडले असून खड्ड्यात पाणी साचल्याने दुचाकी स्वारालाही या रस्त्याने जाणे अवघड झाले आहे. इतकी खराब परिस्थिती या रस्त्याची झाली आहे. त्यातच सप्टेंबर मागील सप्टेंबरमध्ये पुराच्या पाण्याने काही ठिकाणचे पुलच वाहून गेले आहेत ते पुल सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्पुरते रिपेअरही केले होते. मात्र आता पुन्हा पावसाळा आला असून पुन्हा एकदा या रस्त्याने जाणे येणे अवघड होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगीतले.

कार्यारंभ आदेश असूनही काम रखडले या रस्त्याबाबत नोव्हेंबर २०२५ रोजी सुमारे ३६ लाख रुपयांचे निधी मंजूर झाला त्याचे टेंडरिंग होऊनही कार्यारंभ आदेश मिळाले मात्र संबंधित ठेकेदाराने अद्यापही हे काम सुरू न केल्याने ग्रामस्थांना मधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत एक ऑगस्ट पासून हे काम सुरू न झाल्यास त्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा सातवड सेवा संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब वाघ, डॉक्टर भगवान वाघ, पोपटराव पाठक, नवनाथ वाघ, संजय पाठक , पप्पू वडघुले अनिल पाठक , दीपक सरोदे ,अण्णासाहेब सरोदे आदीं सातवड ,कान्होबाची वाडी ग्रामस्थांनी दिला आहे.

## घोड- विसापूर तुडुंब... पण कुकडी अजूनही तहानलेली!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** सुरवातीला पावसाने राज्यात जोर धरला असला तरी कुकडी प्रकल्पातील धरणांची स्थिती अजूनही समाधानकारक नसल्याचे स्पष्ट झाले आहे. २१ जुलैच्या धरणस्थितीनुसार कुकडी प्रकल्पात एकूण ४६ टक्के पाणीसाठा असून खरीप हंगामाच्या तोंडावर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची चिंता कायम आहे त्यामुळे शेकऱ्यांची चांगलीच धाकधूक वाढली आहे तसेच शेतकरी चातकाप्रमाणे पावसाची वाट पाहत आहे.

सुरवातीला काही दिवस धरणाच्या माथ्यावर तसेच परिसरात पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकरी काही काळ समाधानी झाला असला तरीही पावसाने आता शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकवला आहे मागील आठवड्या पासुन पावसाने दडी मारल्याने तसेच धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस पडला नसल्याने शेजाऱ्यांना दुष्काळाचे सावट दिसू लागले आहे आज दि २१ रोजीच्या सरकारी आकड्यानुसार धरणनिहाय आकडेवारी पाहता येडगाव ६१ टक्के, माणिकडोह ३८ टक्के, वडज ८५ टक्के, डिंभे ५७ टक्के, तर पिंपळगाव जोगे धरणात केवळ १० टक्के पाणीसाठा आहे. विशेष म्हणजे दुसरीकडे घोड धरण ९९ टक्के आणि विसापूर धरण ९० टक्के भरले असूनही कुकडी लाभक्षेत्रातील शेतकरी अजूनही पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. खरीप पिकांसाठी पुढील काही दिवस अत्यंत महत्त्वाचे असताना सिंचनाचे आवर्तन कधी जाहीर होणार, याकडे हजारो शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. घोड आणि विसापूर तुडुंब भरले... पण कुकडी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शिवारात पाण्याची प्रतीक्षा अजूनही कायम! असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे त्यामुळे पाणीवाटपाबाबत तातडीने योग्य निर्णय न झाल्यास शेतकरी संघटना आंदोलनाची भूमिका अधिक तीव्र करण्याच्या तयारीत आहेत.त्यासाठी अनेकजण आंदोलनाच्या तयारीत असल्याची माहिती मिळत आहे.

## मारहाण प्रकरणातील आरोपींना अटक करा

### सोमठाणे ग्रामस्थांचा रास्ता रोको

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** पाथर्डी तालुक्यातील सोमठाणे नलवडे येथे २ जुलै २०२६ रोजी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांना तलवार, लोखंडी रॉड व लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी शनिल काकडे यांच्या फिर्यादीवरून संतोष खवले, राहुल खवले, माणिक खवले, अमोल खवले, चिमाजी धनवडे तसेच अन्य सात अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असली, तरी उर्वरित आरोपी अद्याप फरार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. आरोपींना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी सोमठाणे नलवडे गावातील सुमारे ५०० महिला, पुरुष आणि ज्येष्ठ नागरिकांनी सोमवारी तिसगाव येथे अचानक रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनादरम्यान अमोल नलवडे यांनी उर्वरित आरोपी रात्री गावात येऊन दहशत निर्माण करत असल्याचा आरोप केला. शुभांगी काकडे यांनी भीतीच्या वातावरणामुळे गेल्या १८ दिवसांपासून गावातील मुले-मुली शाळेत जात नसल्याचे सांगितले. तर इंदुबाई उकिर्डे यांनी गावात दिवसातून दोन वेळा पोलीस गस्त सुरू करण्याची मागणी केली. यावेळी शिवशंकर राजळे, नवनाथ वाघ आदींनीही आपली मनोगते व्यक्त केली.

रास्ता रोको आंदोलनामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

## घुले पाटील महाविद्यालयात स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहिल्यानगर येथे यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, नवीन प्रवेशित प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी १५ जुलै ते १७ जुलै या कालावधीत तीन दिवसीय ‘स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम’चे आयोजन आय.क्यू.ए.सी. विभागाच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे पेन व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.ए.के.पंदरकर होते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. स्पर्धात्मक युगात जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि ज्ञान अत्यावश्यक आहे. एम.आय.डी.सी. बोल्हेगाव परिसरातील विद्यार्थ्यांना या महाविद्यालयात सर्व भौतिक सुविधा व दर्जेदार शिक्षण उपलब्ध आहे, जे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उपयुक्त ठरेल.



त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आपले जीवन घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच त्यांनी कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.एस., बी.एस्सी. डेटा सायन्स, एम.एस्सी. संगणक विज्ञान आणि एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री या शाखांमधील विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एस. बी. दहातोंडे यांनी केले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ, उपप्राचार्य प्रा. पी. ए. फटांगरे, महिला प्रतिनिधी व राज्यशास्त्र विभागप्रमुख प्राध्यापिका पूनम खरड उपस्थित होत्या. इंडक्शन प्रोग्रामच्या पहिल्या दिवशी नवीन शैक्षणिक धोरणाबाबत प्रा. डॉ. एस. बी. दहातोंडे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

# माळढोक अभयारण्यात परवानगीशिवाय वीज पोल?

## अवदा सोलर कंपनीवर गंभीर आरोप; चौकशीची मागणी

**ऋषभ परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** कर्जत तालुक्यातील मौजे देऊळवाडी (सिद्धटेक) येथील माळढोक पक्षी आरक्षित क्षेत्रामध्ये वनविभागाची आवश्यक परवानगी न घेता अवदा सोलर कंपनीने विद्युत पोल उभारल्याचा गंभीर आरोप वन्यजीव व पर्यावरणप्रेमींनी केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वन्यजीव व पर्यावरणप्रेमी अनिल मारुती लष्करे आणि हनुमंत लक्ष्मण सूळ यांनी संबंधित विभागांकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सदर परिसर हा माळढोक पक्ष्यासाठी आरक्षित अधिवास असून, वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत संरक्षित आहे. अशा संवेदनशील क्षेत्रात वनविभागाची पूर्वपरवानगी किंवा ना-हरकत प्रमाणपत्र न घेता उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांचे पोल उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, या उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांमुळे माळढोकसह इतर दुर्मिळ पक्ष्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने माळढोक अधिवासातील ओव्हरहेड वीजवाहिन्यांबाबत दिलेल्या निर्देशांचेही उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला आहे.



याशिवाय, दौंड-उस्मानाबाद राज्यमहामार्गाच्या नियमांचे उल्लंघन करून रस्त्याच्या हद्दीत अनधिकृतपणे वीज पोल उभारण्यात आल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यात रस्ते रुंदीकरणात अडथळा निर्माण होण्याबरोबरच वाहतुकीच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

या प्रकरणी महसूल विभाग, वन विभाग (वन्यजीव) आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त पथकाने तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा, संबंधित कामाला स्थगिती द्यावी, आवश्यक परवानग्यांची पडताळणी करावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

## पंधरवड्याच्या विश्रांतीनंतर तोंडोळीसह कोरडगावात पावसाचे पुनरागमन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पंधरा दिवसांच्या विश्रांतीनंतर अखेर तोंडोळीसह कोरडगाव परिसरात सोमवारी सायंकाळी पावसाने पुन्हा हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत होता. मात्र सायंकाळी झालेल्या पावसामुळे खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

सकाळपासूनच वातावरणात प्रचंड दमटपणा जाणवत होता. दुपारच्या सुमारास आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केली होती. दिवसभर वारा जवळपास शांत असल्याने उकाडा वाढला होता. सायंकाळी सुमारे चारच्या सुमारास अचानक ढग दाटून आले आणि जोरदार पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या सरी कोसळल्याने परिसरातील वातावरण प्रसन्न झाले.

यावर्षी पावसाने मोठी विश्रांती घेतल्याने बाजरी, मूग, कपाशी, मका, उडीद आदी खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली होती. सध्या शेतात खुरपणीची कामे सुरू असून पिकांना ओलाव्याची नितांत गरज होती. अशा वेळी झालेल्या या पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली असून शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, परिसरातील विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीसाठ्यांची पातळीही घटू लागली होती. त्यामुळे पिण्याच्या पाण्याबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढत होती.

